cmyk

## संपादकीय

### सारस्वतांचा मेळा फलदायी ठरो

दिल्लीच्या विज्ञान भवनात ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अत्यंत थाटात उद्घाटन पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षा आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांनी लोकभाषेत या संमेलनाचे वर्णन दोन कमी शंभर असे केले आहे. १४७ वर्षांची आणि ९७ समारंभांची परंपरा असलेले हे संमेलन दुसऱ्यांदा राजधानी दिल्लीत तेही ७० वर्षांच्या अंतराने होत आहे. त्याची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली तेव्हा महाराष्ट्राचे डोळे तिकडे लागून राहिले होते. रविवारपर्यंत येथे मराठी भाषेचा गजर होईल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०१ | रविवार, दि.२३ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये







# भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेतकरीच

## कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, शेतीचा आत्मा शेतकरी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही कृषी क्षेत्रात सतत काम करत आहोत. एक काळ असा होता की, भारत अमेरिकेतून अन्नधान्य आयात करत असे. आता भारत अन्नधान्य निर्यात करणारा आघाडीचा देश बनला आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले.**

भारतीय कृषी संशोधन संस्था, नवी दिल्ली आयोजित तीन दिवसीय पुसा कृषी विज्ञान मेळा २०२५ चे उद्घाटन चौहान यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशू पाठक आदी उपस्थित होते. आयसीएआरचे अभिनंदन करताना शिवराज सिंह चौहान म्हणाले की, शेतीशास्त्रज्ञ दिवसरात्र मेहनत घेत आहेत. आमची ६ कलमी



रणनीती आहे. त्यामध्ये उत्पादन वाढवणे हा प्रमुख मुद्दा आहे. त्यासाठी चांगले बियाणे आयसीएआर तयार करत आहे. शेतकऱ्यांपर्यंत ब्रीडर सीड आणि फाउंडेशन सीड पोहोचतील याची खात्री केली जात आहे. बियाणे पोहोचवण्यासाठी, विज्ञान आणि शेतकरी यांना जोडले जावे लागेल. याला मॉडर्न ॲग्रीकल्चर चौपाल म्हणतात. शिवराज सिंह म्हणाले की, दुसरे मोठे काम म्हणजे उत्पादन खर्च कमी करणे. उत्पादन वाढले की खर्च कमी होतो. या संदर्भातही अनेक योजना आहेत. २४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान भागलपूरमधील किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पाठवतील. शेतकऱ्यांच्या खर्चाचीही व्यवस्था आपल्याला करावी लागेल. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. तिसरे काम म्हणजे उत्पादनाला योग्य किंमत देणे. यासाठी, एमएसपीमध्ये सातत्याने वाढ करण्यात

पान २ वर

# राहुल बाबा बघा! मोदींनी २० लाख घरे दिली

## गृहमंत्री अमित शहा यांचा टोला



**पुणे । प्रतिनिधी**

राहुल बाबा हे पहा..पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महाराष्ट्रातील जनतेला वीस लाख घरे दिर्ली असा टोला केंदीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुणे शहरातील कार्यक्रमात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना लगावला. यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर विकास कामे अन गरिबांचे कल्याण देशाच्या एकाही पंतप्रधानांनी केले नाही असेही त्यांनी सांगितले.

पान २ वर

# आरोपींना मदत करणाऱ्या पोलिसांचा बंदोबस्त केला जाईल–आ.सुरेश धस

## सुरेश धस यांची मस्साजोगला भेट; ग्रामस्थांशी केली चर्चा



**बीड । प्रतिनिधी**

आरोपींना न्यायालयात हजर करताना काहीजण आरोपींना भेटतात. आणि कारागृहात आरोपींना सुविधा पुरविण्याचे काम करणारे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद असणाऱ्यांची चौकशी करा. केवळ पोलीस अधिक्षक बदलून चालणार नाही. सध्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे चांगले काम करत आहेत. मात्र त्यांच्या खाली अनेक वर्षांपासून पोलीस ठाण्यात आकाच्या सांगण्यावरून काम करणारे पोलीस कर्मचारी तेच आहेत. अशा आरोपींना मदत करणाऱ्यांच्या संबंधी गृहमंत्र्यांशी बोलून त्यांचा बंदोबस्त केला जाईल. राजकीय दबाव व अर्थिक लाभासाठी काम करणाऱ्या अनेक वर्षांपासून केज, युसुफवडगाव, बर्दापूर, परळी

पान २ वर

### आ.सुरेश धस यांना दाखवले काळे झेंडे

भाजप आमदार सुरेश धस परळीच्या दौऱ्यावर होते. गोपीनाथगडावर दर्शन घेऊन ते बीडकडे निघाले. त्यावेळी त्यांची कार सिरसाळा चौकात आल्यानंतर काही तरुणांनी त्यांचा ताफा रोखण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जोरदार घोषणा दिल्या. काळे झेंडे दाखवले. त्यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली. यावेळी पोलिसांनी काही तरुणांची धरपकड केली. याशिवाय परळीतही ते बँक कॉलनीकडे महादेव मुंडे यांच्या घराकडे जात असताना काही युवकांनी सुरेश धस हे परळीची बदनामी करत आहेत. सुरेश धस मुर्दाबाद च्या घोषणा देत काळे झेंडे दाखवत निषेध केला. तात्काळ या युवकांना बाजूला करत सुरेश धस यांचा रस्ता रिकामा केला गेला.

### परळीत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची घेतली भेट



परळी येथील महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी १५ महिने होऊनही कसे काय सापडत नाहीत? पोलीस काय करत आहेत? असा प्रश्न उपस्थित करून येथील पोलीस ठाण्यात गेल्या दहा–बारा वर्षांपासून कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन नवीन पोलिसांची नियुक्ती करा, अशी मागणी भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी शनिवारी परळीत माध्यमांशी बोलताना केली आहे. शहरातील बँक कॉलनीतील महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांची आमदार सुरेश धस यांनी भेट घेतली. यावेळी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पतीच्या खुनाबद्दल माहिती दिली व न्याय मिळण्याच्या मागणीसाठी आपण जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात मंगळवार पासून (दि.२५) उपोषण करणार असल्याचे सांगितले.

### ग्रामस्थांच्या मागण्या; मागण्या मान्य न झाल्यास अन्नत्याग

पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन व पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांना बडतर्फ करा. सायबर सेलमध्ये दोन तज्ञ पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. हत्येच्या घटनेच्या पुर्वीचे सीडीआर तपासावे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन व पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांना सह आरोपी करावे. फरार कृष्णा आंधळे याला तात्काळ अटक करावी. वाशी येथून पळून जाण्यास आरोपींना मदत करणाऱ्या रमेश घुले, दिलीप गित्ते, गोरख फड व दत्ता बिक्कड या पोलीस कर्मचाऱ्यांना सहआरोपी करा. डॉ. संभाजी वायबसे व आरोपींनी पैशाची मदत करणाऱ्या त्यांची पत्नी यांच्यासह बालाजी तांदळे, संजय केदार व सारंग आंधळे यांनाही सह आरोपी करा. सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करा. हा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी. या मागण्या मान्य न झाल्यास २५ फेब्रुवारी पासून मस्साजोग ग्रामस्थ अन्नत्याग आंदोलन करण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे सांगितले.

### भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष वसुंधरा राजे होणार?

जयपूरः राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या वसुंधरा राजे यांना भाजपमध्ये मोठी जबाबदारी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. वसुंधरा राजे यांना भाजपचे राष्ट्रीय

पान २ वर

# मॉन्सूनचा पाऊस यंदाही चांगलाच राहणार

## जागतिक हवामान केंद्रांचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**देशात २०२५ च्या मॉन्सून हंगामात पाऊस कसा पडेल? याची चर्चा आतापासूनच सुरु झाली आहे. काही जागतिक हवामान केंद्रांच्या अंदाजानुसार देशात यंदाही सरासरी पावसाचा अंदाज दिला आहे. युरोपियन हवामान अंदाज केंद्र, दक्षिण कोरियाचे अपेक हवामान केंद्र, कोलंबिया विद्यापिठाचे आयआरआय केंद्र, जपानचा हवामान विभाग, युके हवामान विभाग संस्थांनी भारतात मॉन्सूनमध्ये चांगल्या पावसाचे संकेत दिले. भारतीय हवामान विभाग एप्रिलमध्ये आपला पहीला अंदाज जाहीर करेल.**

मागच्या हंगामात चांगले पाऊसमान झाल्याने शेतकऱ्यांना आता यंदा पाऊस कसा राहील? याचा अंदाज जाणून घेण्यात उत्सुकता आहे. देशात २०२५ चा मॉन्सून कसा राहील याविषयी दीर्घकालीन पल्ल्याचा अंदाज भारतीय हवामान विभाग एप्रिल महिन्यात देईल. बहुतांशी मॉड्यूल्समधून जून महिन्यात देशभरात पाऊस पडण्याचा अंदाज

पान २ वर

### अल निना स्थिती तटस्थ

पण प्रशांत महासागरातील हवामान पॅटर्न्सनुसार भारतात जून ते सप्टेंबर या काळात मॉन्सून सरासरी राहील, असे संकेत काही जागतिक हवामान मॉड्यूल्समधून मिळत आहेत. बहुतांशी हवामान विषयक मॉड्यूल्सने अपेक्षा व्यक्त केली की, भारतात मॉन्सून देशभरात व्यापलेला असताना अल निना स्थिती तटस्थ अवस्थेत येऊ शकते. कोणत्याही जागतिक मॉड्यूलने देशातील कोणत्यातही भागात विशिष्ट काळात कमी पावसाचे संकेत दिलेले नाहीत.

# पवित्र रमजानच्या अनुषंगाने मुस्लिम बहुल भागात सोयी–सुविधा सुरळीत करा

## आ.संदीप क्षीरसागरांकडून नगरपरिषदेला सूचना



**बीड । प्रतिनिधी**

पुढील महिन्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्येच पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. या अनुषंगाने बीड शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत जोडणी, स्वच्छतेची कामे लवकरात लवकर करून घ्या. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. यावर्षी पवित्र असलेला रमजान महिना मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच

पान २ वर


### सूचना

केज तालुका प्रतिनिधी म्हणून दुर्गादास लांब यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तरी केज तालुक्यातील बातम्या, अंक व जाहिरातींबाबत त्यांच्याशी संपर्क करावा.




:::: संपर्क ::::

दुर्गादास लांब

केज तालुका प्रतिनिधी

मो.९७६५५०६०५०


# छावा चित्रपटावरून गणोजी शिर्केंच्या वंशजांचा आक्षेप; दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकराची माफी



**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित छावा सिनेमातील गणोजी शिर्के यांच्याबाबतच्या माहितीवर शिर्केंच्या वंशजांनी आक्षेप घेतला आहे. इतिहासाची तोडमोड करुन हा सिनेमा प्रदर्शित करण्यात आल्याचा आरोप गणोजी शिर्केंच्या वंशजांनी केला आहे. आमच्या कुटुंबाची बदनामी करण्याचा हा कट असल्याचे दीपक शिर्के यांनी केला आहे. त्यांच्या आक्षेपानंतर आता छावा सिनेमाचे दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर यांनी त्यांची माफी मागितली आहे.

पान २ वर

# पत्र्याच्या शेडवर टिप्पर चालकाने वाळू टाकली ; पाच कामगारांचा दबून मृत्यू

**जालना । वृतसंस्था**

**जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात पासोडी शिवारात पुलाच्या बांधकामासाठी आलेल्या मजुरांच्या पत्र्याच्या शेडवर मध्यरात्री वाळूचा टिप्पर ओतल्याने वाळूखाली दबून ५ जणांना मृत्यू झाला. दि.२२ फेब्रुवारी, शनिवारी पहाटे ३.३० वाजता ही घटना घडली. गावकऱ्यांनी धाव घेतल्याने वाळूच्या ढिगाऱ्याखालून एक लहान मुलीला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले मात्र इतर पाच जणांचा मात्र जागेवरच मृत्यू झाला.**

जाफराबाद तालुक्यातील पासोडी शिवारात एका पुलाच्या कामासाठी हे मजूर आले होते. पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणाजवळच असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये हे कुटुंब झोपलेले होते. पहाटे साडेतीन वाजता आलेल्या वाळूच्या टिप्परचालकाने

पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,८०२ | ३,३५८ | ३,२११ |
| ज्वारी/हायब्रिडः १३६.००क्विंटल | १,८०० | ३,६५० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ७,००१ | ७,३८१ | ७,१७१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,३०० | ३,३०४ | २,८४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ३,६०० | ४,००० | ३,८४३ |
| हरभरा:५.५० क्विंटल | ५,२६० | ५,३०० | ५,२८० |

# दार उघड दिल्ली, दार उघड...!

## इंद्रजीत भालेरावांनी कवीतेतून मांडली बळीराजाची व्यथा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये दुसऱ्या दिवशी, शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी, तालकटोरा स्टेडियम मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपामध्ये निमंत्रित कवींनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. निमंत्रित ४२ कवींनी शेतकऱ्यांच्या व्यथा, आई–बाप, स्त्री सशक्तीकरण यासह विविध विषयावरील कविता मांडल्या. या कवी संमेलनाचे अध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांनी त्यांची शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी



''दार उघड दिल्ली दार उघड'' ही कविता मांडून शेतकऱ्यांचा आंदोलनाचा प्रश्न राजधानीत मांडला. या कवी संमेलनामध्ये महाराष्ट्र बाहेर बंगळुरू, दिल्ली आणि राजधानी परिसर, हैदराबाद या विविध ठिकाणी राहणाऱ्या कवींनी कविता मांडल्या.

पान २ वर

### दिल्लीचे खंदक अधिक जीव घेणे

''तोडो दिल्ली के कांगोरे'' म्हणत चारशे वर्षापूर्वी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी पंजाबच्या लोकांनी दिल्लीवर आक्रमण केले होते. तेव्हा औरंगजेबाने शेतसारा माफ केला. आजही पंजाबचा शेतकरी दिल्लीवर आक्रमण करतो आहे, पण दिल्लीच्या सीमा आणखी कठोर झाल्या आहेत. दिल्लीचे खंदक अधिक जीव घेणे झाले आहेत. असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणाच्या शेवटी त्यांनी ''दार उघड दिल्ली दार उघड, बळी आला दारी आता दार उघड'' ही कविता मांडून बळीराजाची व्यथा अध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांनी त्यांच्या शब्दातून मांडली. दिल्ली शेतकऱ्यांसाठी किती क्रूर आहे याची शब्दांतून त्यांनी मांडणी केली.

# माजी गव्हर्नर शक्तिकांत दास मोदींचे प्रधान सचिव



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गव्हर्नर पदावरून निवृत्त झाल्यानंतर शक्तीकांत दास यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शक्तिकांत दास आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रधान सचिव म्हणून काम करतील. तशा आशयाचा आदेश केंद्र सरकारने काढला आहे. शक्तिकांत दास हे पंतप्रधानांचे दुसरे प्रधान सचिव असतील. २०१९ सालापासून पी के मिश्रा हे पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून काम करत असून त्यांच्यासोबतीला शक्तिकांत दासही काम करतील. गव्हर्नर म्हणून सहा वर्षे सेवा केल्यानंतर शक्तिकांत दास डिसेंबर २०२४ मध्ये निवृत्त झाले. आता प्रधान सचिव या नात्याने ते पंतप्रधानांना प्रमुख आर्थिक धोरणात्मक सल्ला देण्याची भूमिका बजावतील. शक्तीकांता दास हे ओडिशाची राजधानी भुवनेश्वरचे रहिवासी आहेत.

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सारस्वतांचा मेळा फलदायी ठरो

दिल्लीच्या विज्ञान भवनात ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अत्यंत थाटात उद्घाटन पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षा आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांनी लोकभाषेत या संमेलनाचे वर्णन दोन कमी शंभर असे केले आहे. १४७ वर्षांची आणि ९७ समारंभांची परंपरा असलेले हे संमेलन दुसऱ्यांदा राजधानी दिल्लीत तेही ७० वर्षांच्या अंतराने होत आहे. त्याची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली तेव्हा महाराष्ट्राचे डोळे तिकडे लागून राहिले होते. रविवारपर्यंत येथे मराठी भाषेचा गजर होईल. हे करत असताना मराठीला नुकताच मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा या समारंभाची शोभा आणि उत्साह वाढवणारा ठरलेला आहे. दिल्लीवर मराठ्यांचा जरीपटका फडकवण्यासाठी ज्या मैदानावर मराठा लष्कराचे तळ शिंदे आणि होळकर यांच्या सहभागाने दाखल झाले होते त्याच तळावर असलेल्या तालकटोरा स्टेडियममध्ये मराठीचे हे संमेलन होत आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

एकीकडे मराठी प्राथमिक शिक्षणातून हद्दपार होते की काय याची चिंता खूप मोठा वर्ग प्रदीर्घ काळ करत आहे. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतच झाले पाहिजे असे मान्यवर सांगत असले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढतच चालली आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्यांची संख्या १२ कोटी पेक्षाही अधिक असली तरीही अनेकांच्या बोलीतून मराठी हद्दपार होऊ लागली आहे. मराठी संवादात हिंदी किंवा इंग्रजी प्रतिशब्द सहज व्यवहारात देखील उच्चारले जात आहेत. म्हणजेच अनेकांच्या बोलीत भेळमिसळ झाल्याचे दिसत आहे. अशा काळात होणारे हे संमेलन कशी दिशा देणार? हे पाहणे औत्सुक्याचे असेल. आपल्या पहिल्याच भाषणात संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या अनुभवी शब्दांची फुंकर घालून मराठी मनावर साचलेली राख हटवण्याचा प्रयत्न केला. तोही अगदी बेमालूमपणे. आपण काही उपाय सांगत आहोत अशा थाटात न बोलता आपल्या अनुभवी आणि ओघवत्या शैलीत त्यांनी संवाद साधला आणि दिशादर्शन देखील केले. या संमेलनाच्या निमित्ताने पंतप्रधानांना देण्यात आलेल्या विठ्ठल रखुमाईच्या चित्राचा उल्लेख करून अध्यक्ष डॉ. भवाळकर यांनी विठ्ठल हा इथल्या संस्कृतीचा समन्वय कसा आहे याची अत्यंत समर्पक अशी उजळणी संपूर्ण सारस्वत विश्वाला करून दिली. महाराष्ट्राबाहेर चाललेल्या मराठीच्या या महासंमेलनाच्या वेळीच खुद्द महाराष्ट्रात समाज जाती जातींमध्ये विभागण्याचे संकट असताना या भूमीची जडणघडण कशी झाली त्याची आठवण महाराष्ट्राला करून दिली. मराठी संतांनी पुरोगामीपणे जात, पात, पक्ष, पंथ भेदाच्या पलीकडे जपले. भाषा ही संस्कृतीचे बलस्थान असते, ती जोडणारी हवी, तोडणारी नाही. असे विचार त्यांनी देशासमोर ठेवले आहेत.

महाराष्ट्राच्या दृष्टीने हा समारंभ भावनिक देखील होता. एक तर दिल्ली हे त्याचे एक कारण. त्यात यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्रा जोशी यांच्याकडे, स्वागताध्यक्षपद काकासाहेब गाडगीळ यांच्याकडे व उद्घाटनाला पंतप्रधान पंडित नेहरू यांची उपस्थिती होती. यंदाच्या संमेलनाला एक गुणवंत स्त्रा अध्यक्षपदी, ज्येष्ठ नेते शरद पवार स्वागताध्यक्षपदी आणि पंतप्रधान मोदी उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

मोदी यांनी मातृभाषेतून शिक्षणाच्या भारत सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाचे या निमित्ताने गुणवर्णन केले. त्यासाठी केशवसुतांच्या जुने जाऊ द्या मरणालागुनी या काव्यपंक्तींचा अत्यंत चपखलपणे आणि राजकीय हेतूही साध्य केला. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाची साडेतीनशे वर्षे, अहिल्यादेवी होळकर यांची तीनशेवी जयंती, संविधानाचा अमृत महोत्सव आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष, त्यात अभिजाततेचा मिळालेला दर्जा या सर्वाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. संघाच्या कार्यामुळे आपण मराठी भाषा चांगल्या पद्धतीने जपू शकलो व अभिजात दर्जा देण्याच्या कामात आपला सहभाग लाभला हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या भाषणात मराठी माणसाची या दिल्लीला काबीज करण्याची इच्छा यांचा उल्लेख करतानाच मराठी साहित्याचा संत साहित्य पासून पुरोगामी, दलित साहित्यापर्यंतचा प्रवास आपल्या ओघवत्या शैलीत मांडून संमेलन सर्वसमावेशी होण्याच्या दृष्टीने एक पाऊल टाकले. दोन कमी असले तरी शंभर होण्याकडे सुरू असलेली ही वाटचाल योग्य दिशेने आणि गतीने झाली तर मराठी ज्ञान भाषा होण्याचे स्वप्न आणि बोली भाषा म्हणून ती मराठी माणसांच्या जिभेवर सदैव वास करण्याची आस पूर्ण होईल. त्यादिशेने हे संमेलन जावे.

# भाजपा सक्रीय सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात




**जालना । प्रतिनिधी**

**राज्यात भाजप पक्षाच्या सक्रीय सदस्यता नोंदणी अभियान सुरु झाले आहे, भाजपा नेते तथा माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्ह्यात भारतीय जनता पार्टी च्या सक्रीय सदस्य नोंदणीला आजपासून (दि.२२) सुरुवात करण्यात आली.**

सक्रीय सदस्य होण्यासाठी भाजपा पदाधिकाऱ्याला १०० सक्रिय सदस्य करावे लागणार आहेत, अन्यथा सक्रीय सदस्य होता येणार नाही. पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी १०० नवीन सदस्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून ते सक्रिय सदस्यत्वासाठी पात्र ठरतील. प्रत्येक सक्रिय सदस्याला नमो ॲपद्वारे १०० रुपये सदस्यता शुल्क भरावे लागेल. यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, बेटी बचाव बेटी पढाव जिल्हा संयोजिका अरुणाताई जाधव, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, जिल्हा उपाध्यक्ष राजू गवई, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुदर्शन काळे, हिराबाई सुदर्शन काळे, राजेश जोशी, उद्धव ढवळे, सुधाकर शिंदे, विष्णू दराडे यांनी भाजपा सक्रीय सदस्यता नोंदणी करून घेत भाजपा पक्षाचे सक्रीय सदस्य झाले आहेत.

# आ.नारायण कुचे यांच्या प्रयत्नामुळे घरकुल धारकांना पहिला हप्ता प्राप्त



**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यातील प्रधानमंत्री आवास टप्पा क्र.२ मधील घरकुल लाभार्थ्यांना केंद्रीय मंत्री अमितजी शहा ,मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , उपमुख्यमंत्री अजित दादा पवार , ना. जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत बालेवाडी पुणे येथे व्हिडीओ कॉन्फरणस कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा क्र-२ अंतर्गत बदनापूर तालुक्यातील २५३७ लाभार्थ्यांना तसेच अंबड तालुक्यातील ४५६७ लाभार्थ्यांना घरकुलांचा पहिला हप्ता ऑनलाईन पद्धतीने वितरित करण्यात आला.**

याप्रसंगी अंबड व बदनापूर तालुक्यातील लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्र आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले, यावेळी उपस्थित भाजपा जालना उपाध्यक्ष दीपकसिंह ठाकूर, अंबड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अवधूत नाना खडके, औदुंबर बागडे, डॉ.नंदकिशोर पिंगळे, अंबड पंचायत समिती गटविकास अधिकारी उदयसिंग राजपुत, श्रीराम नागरे, रमेश शहाणे, डॉ.राहुल डोंगरे, विठ्ठल सिंहा राणा व उपस्थित सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, कर्मचारी, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार-माजी आ.गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यभरातील पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी येथे दिले. गुरुवार (दि. २०) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्ह्याच्यावतीने दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ. गोरंट्याल बोलत होते. यावेळी पीसीएमचे राज्य सरचिटणीस महेश जोशी, संस्थापक सरचिटणीस विजयकुमार सकलेचा, जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.**

प्रारंभी, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस माजी आ. गोरंट्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आचार्य जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले.पुढे बोलतांना माजी आ. गोरंट्याल दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा पुतळा बसविण्यासाठी आपण शंभर टक्के प्रयत्न करून त्याच बरोबरच राज्यातील पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या ज्या काही मागण्या आहेत. कॉंग्रेसच्या वरिष्ठांशी चर्चा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही गोरंट्याल म्हणाले. प्रास्तविक करतांना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी बाळशास्त्री



जांभेकर यांना अभिवादन केले. तसेच आचार्य जांभेकर यांचे पत्रकारिता क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात मोठे कार्य आहे. दर्पण आणि मासिक दिग्दर्शन या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात योगदान दिले. तर अनिष्ठ रुढी परंपरा बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांचे सामाजिक कार्यही मोठे आहे. त्यामुळे जालना महानगर पालिका हद्दीतील बस स्थानक ते छत्रपती संभाजीनगर रोड, लक्कडकोट मार्गास दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव देण्यात यावे व याच भागात त्यांचा अर्धकृती पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी माजी आ. गोरंट्याल यांच्याकडे केली. तसेच शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार दर दोन वर्षांनी महागाई निदेशांकाची सांगड घालून वृत्तपत्रांना दरवाढ देणे आवश्यक असतांना गेल्या सहा वर्षांत एकदाही दरवाढ झालेली नाही, या व इतर पत्रकार वृत्तपत्रांच्या मागण्या मांडल्या. यापुर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह सध्याचे आमदार खोतकर यांना निवेदन दिले मात्र, त्यांनी निवेदनाची कोणतीही दखल अद्यापपर्यंत घेतली नाही. आपण पत्रकार वृत्तपत्रांच्या समस्यांकडे लक्ष देऊन समस्या सोडवाव्यात अशी विनंती माजी आ. गोरंट्याल यांना केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुहास वैद्य यांनी केले तर आभार शेख ईस्माइल यांनी मानले. दरम्यान, माजी आ. गोरंट्याल यांना पीसीएम जालनाच्यावतीने पत्रकार व वृत्तपत्रांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी ज्ञानेश्वर ढोबळे, शेख उमर, संदीप भाकरे,नरेंद्र जोगड , शेख नबी सिपोराकर , बद्री उपरे, संतोष भुतेकर, योगेश पिछाडे, राहुल भालके यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती.

## पान १वरून...

### राहुल बाबा बघा!

पंतप्रधान ग्रामीण आवास योजना टप्पा दोन या योजने अंतर्गत राज्यातील वीस लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण आणि साडेदहा लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम पुणे शहरातील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे शनिवारी सायंकाळी गृहमंत्री शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी व्यासपीठावर राज्याचे मुख्यमंत्र्यांनी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंदीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार मोरे, राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले, माधुरी मिसाळ यांची उपस्थिती होती. यावेळी पुणे जिल्ह्यातील सुमारे दहा हजार पेक्षा जास्त लाभार्थी या ठिकाणी बसने प्रवास करीत आले होते.यात गरीब शेतकरी बांधवांची संख्या जास्त होती. यावेळी भाषणात शह म्हणाले, आज मला राहुल गांधी यांची आठवण होत आहे कारण जेव्हा मोदी यांनी जनधन योजना सुरू लेली होती त्यावेळी राहुल गांधी म्हणाले होते की,बँकेत इतकी खाती उघडली पण त्यात टाकणार काय पण मोदींनी ती योजना यशस्वी करून दाखवली.ते पुढे म्हणाले जेव्हा देवेंद्र यांचा मला फोन आला की २० लाख घरे प्रदान करायची आहेत तेव्हा अंगावर रोमांच आले.महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक घरे वाटप झाली असून हा चमत्कार देवेंद्र फडणवीस,एकनाथ शिंदे आणि अजित पवार यानी केलेल्या वेगवान कामांचा आहे, असे ते म्हणाले.

-------------

### भारतीय अर्थव्यवस्थेचा

आली आहे. सरकार शेतकऱ्यांचा गहू, तांदूळ, मसूर, उडीद आणि तूरदेखील खरेदी करेल. शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळावी म्हणून केंद्र सरकार नाफेडमार्फत वाहतूक खर्च देईल अशी आमची योजना आहे. शिवराज सिंह म्हणाले की, जेव्हा सोयाबीनचे दर घसरले तेव्हा बाहेरून येणाऱ्या तेलावरील आयात शुल्क २७.५% पर्यंत वाढवण्यात आले. तांदळाच्या निर्यातीवर बंदी होती, आम्ही ती काढून टाकली आणि निर्यात शुल्क कमी केले. मधला नफा कमी करायला हवा, आम्ही यावर काम करत आहोत. चौथे मोठे काम म्हणजे जेव्हा नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होते तेव्हा आम्ही प्रधानमंत्री फसल विमा योजनेद्वारे मदत पुरवतो. शेतकऱ्यांना मिळणारे कर्ज ७ लाख कोटी रुपयांवरून २५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. एक काळ असा होता जेव्हा भारताला अमेरिकेतून पीएल ४८० गहू आयात करावा लागत असे. आज भारत अनेक देशांना अन्न पुरवत आहे. हे आपल्या शेतकऱ्यांच्या कठोर परिश्रमामुळे घडले आहे. आपल्याला असे अनेक प्रयत्न करावे लागतील, असे ते म्हणाले.

-------------

### आरोपींना मदत करणाऱ्या पोलिसांचा

शहर, परळी ग्रामीण, संभाजीनगर व सिरसाळा पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्यास इतर ठिकाणी बदल्या केल्या पाहिजेत, असे आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणारे आमदार सुरेश धस यांनी शनिवारी सकाळी मस्साजोग येथे भेट देऊन संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख व ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आरोपींना फासावर चढवून देशमुख कुटुंबियांना न्याय मिळवून देण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे सांगितले. त्यामुळे देशमुख कुटुंबीय व मस्साजोग ग्रामस्थांनी आमदार धस यांच्यावर पूर्ण विश्वास दाखवला. यावेळी मस्साजोग ग्रामस्थांनी आमदार धस यांच्या समोर काही मागण्या मांडल्या. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, या आपल्या मागण्यांपैकी सरकारी वकीलाच्या नियुक्तीचे आदेश तयार असून हा खटला जलदगती न्यायालयात चालविला जाणार आहे. इतर मांगण्यासंबधी मी जिल्हा पोलीस अधिक्षकांशी बोलणार आहे. यावेळी सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आलेले व सध्या पोलीस मुख्यालयात असणारे पोलीस निरीक्षक हे केज पोलीस ठाण्यात जाऊन लॅपटॉपवर बसून काय करतात? असा प्रश्न उपस्थित करून या गुन्ह्याचे चार्जसीट (दोषारोप पत्र) दाखल करण्याच्या मचकूरात काही अफरातफर करतात की काय असा संशय आहे. हत्येच्या घटनेनंतर संतोष देशमुख यांचा मृतदेह बोरगाव शिवारातून घेऊन जाणारे पोलीस वाहन केज आणण्याचे सोडून कळंब शहराच्या दिशेने पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांनी का वळविले? तर राजकीय दबावामुळे त्यांना या घटनेला वेगळेच वळण देऊन संतोष देशमुख यांना मृत्यू पश्चातही बदनाम करण्याचा कट करण्याचा इरादा होता. सध्या पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या कामावर देशमुख कुटुंबीय व ग्रामस्थ समाधानी असल्याचे सांगितले. त्यामुळे या हत्या प्रकरणात देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देऊन आरोपींना फाशीची शिक्षा होईपर्यंत मी माझ्या भूमिकेशी ठाम असल्याचे प्रसारमाध्यमांशी बोलताना आ.सुरेश धस यांनी सांगितले. यावेळी आमदार सुरेश धस यांच्यावर मस्साजोग ग्रामस्थांनी पूर्णपणे विश्वास दाखवला.

-------------

### पवित्र रमजानच्या अनुषंगाने मुस्लिम

येणार आहे. पवित्र रमजान महिन्याच्या आगमनानंतर मुस्लिम बांधव पूर्ण महिनाभर कडक उपवास आणि अल्लाह ची उपासना करतात. त्यामुळे विविध सोयी सुविधा सुरळीतपणे उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यामुळे शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करणे, विद्युत जोडणी पूर्ण करणे तसेच परिपूर्ण स्वरूपात स्वच्छतेची कामे करणे इत्यादी कामे प्राधान्याने, पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वीच करून घ्यावेत अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत.

-----------

### मॉन्सूनचा पाऊस यंदाही

आहे आणि ईशान्य भारतातही सरासरी पाऊस पडू शकतो, असे संकेत मिळत आहेत. दक्षिण कोरियाच्या अपेक हवामान केंद्राने आधीच प्रशांत महासागरातील परिस्थिती तटस्थ राहून भारतात मॉन्सूनचा पाऊस सरासरी राहील, असे संकेत दिले आहेत. युरोपियन हवामान अंदाज केंद्राने देशात मार्च, एप्रिल आणि मे महिन्यातही सरासरी पावसाचा अंदाज दिला. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात देशात पूर्व मोसमी पाऊस पडतो. युरोपियन हवामान अंदाज केंद्राने हा पाऊस सरासरी किंवा सरासरीपेक्षा जास्त राहील याची ४० ते ५० टक्के शक्यता वर्तविली आहे. युरोपियन हवामान अंदाज केंद्राने मे, जून आणि जुलै महिन्यात तमिळनाडू सोडून दक्षिण द्वीपकल्प तसेच पूर्व किनारी भागासह अरबी समुद्रात सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज दिला. पूर्व आणि ईशान्य भारतातही या तीन महिन्यांमध्ये चांगला पाऊस राहण्याचा अंदाज या केंद्राने दिला. युरोपियन हवामान अंदाज केंद्र, कोलंबिया विद्यापिठाचे आयआरआय केंद्र, जपानचा हवामान विभाग, युके हवामान विभाग या जागतिक मॉड्युल्सनीदेखील मॉन्सूनमध्ये चांगल्या पावसाचे संकेत दिले, तरी देखील आत्ताच मॉन्सूनविषयी बोलणे खूपच लवकर आहे. मधल्या काळात वातावरणीय घडामोडी घडून प्रशांत महारागरातील हवामान बदलू शकते. याचा परिणाम आपल्या मॉन्सूनवर होऊ शकतो. त्यामुळे भारतीय हवामान विभाग एप्रिलच्या दीर्घकालीन अंदाजात काय म्हणते, याकडे सर्वांचे लक्ष असेल.

-----------

### भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष

अध्यक्ष बनवले जाऊ शकते असे बोलले जाते आहे. वसुंधरा राजे यांनी अलीकडेच चारभुजा नाथजींचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भेट दिली तेव्हा या संदर्भात चर्चांनी जोर धरला आहे. त्यांनी चार भुजा नाथ मंदिराला भेट दिल्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे. जयपूर भाजपमध्ये नवीन राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्यासाठीच्या हालचालींना वेग आला आहे. १४ मार्चपूर्वी भाजपला नवीन राष्ट्रीय अध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून निवडणूक प्रक्रिया सुरू होईल. फेब्रुवारीच्या अखेरीस १८ राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण होताच राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाईल.

-------------

### पत्र्याच्या शेडवर टिप्पर चालकाने वाळू

निष्काळजीपणाने वाळूचा टिप्पर पत्र्याच्या शेडवर रिचवल्याने शेडमध्ये झोपलेले ६ जण ढिगाऱ्याखाली दाबले गेले. समोरच्या खोलीत झोपलेल्या महिलेच्या हा प्रकार लक्षात आल्याने तिने आरडाओरड केली असता टिप्परचालकाने तेथून पळ काढला. महिलेने आजूबाजूच्या गोठ्यावर जाऊन शेतकऱ्यांना बोलावून आणले असता त्यांनी वाळू बाजूला करून दबलेल्यांना बाहेर काढले. त्यापैकी एक १२ वर्षीय मुलीला वाचवण्यात यश आले. मात्र इतर पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये गणेश काशिनाथ धनवई (वय -५०) रा. गोळेगाव, ता. सिल्लोड, भूषण गणेश धनवई (वय १७) रा. गोळेगाव, ता. सिल्लोड, राजेंद्र दगडूबा वाघ (वय -४०) रा. दहिद, ता. बुलढाणा, सुनील समाधान सपकाळ, वय -२० रा. पद्मावती, ता. भोकरदन जि. जालना, सुपडू आहेर, (वय ३८) रा. तोंडापूर, ता. जामनेर, जि. जळगाव अशी मृतकांची नावे आहेत. मृतक सर्वजण एकमेकांचे सख्खे नातेवाईक आहेत. रवींद्र आनंद या ठेकदाराचे हे काम सुरु आहे. या कामासाठी स्वस्त वाळू उपलब्ध व्हावी या उद्देशाने ठेकेदार रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा करून टाकत होता. पहाटे साडेतीन वाजता ही घटना घडली असता जाफ्राबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतकांचे शव ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता स्थानिक गावकऱ्यांनी पंचनामा न करता शव ताब्यात घेऊ नये असा पवित्रा घेतला. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा केला. अवैध वाळूचा विषय असल्याने महसूल पथकालाही पाचारण करण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक इंगळे यांनी दिली.

-------------

### दार उघड दिल्ली,

कवी संमेलनाचे अध्यक्ष इंद्रजीत भालेराव म्हणाले की, मोठ्या अडथळ्याची शर्यत पार पडून कवी संमेलन पार पडत आहे. दरवर्षीच्या कवी संमेलनापेक्षा यंदा प्रतिसाद चांगला आहे. दिल्लीकर खूप चांगला प्रतिसाद देत आहेत. ४२ वर्षांपासून संमेलन अनुभवत आहे. १९८२ मधे अंबाजोगाई पासून ते यंदाचे राजधानी दिल्लीतील सगळी संमेलन अनुभवली आहेत. १९९३ साली वि. दा. करंदीकराच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात झालेले संमेलन तेव्हापासून मागच्या ३२ वर्षापासून संमेलनात कविता सादर करत आहे, असे ते म्हणाले. ३ वेळेस कवी संमेलनचे अध्यक्षपद भूषवले आहे, असे ते म्हणाले. कवी संमेलनातून पुढे आलेले कवी गाजतात, साहित्य संमेलनाने मला पुढे आणलेच आणि संमेलनात मांडलेल्या कविता गाजल्या, असे ते म्हणाले. साहित्य संमेलनाने कवी आणि कविता घडत असतात, असे ते म्हणाले. इंद्रजीत भालेराव म्हणाले की, पंचवीस वर्षांपूर्वी शरद जोशींनी तालुका तालकटोरा स्टेडियमवर शेतकऱ्यांचा मोठे आंदोलन केलं होतं. तेव्हापासून शेतकरी दिल्लीला धडका मारतो आहे. मागच्या २५ वर्षापासून शेतकरी दिल्लीला धडका मारतो आहे. नव्हे नव्हे मागच्या ३५० वर्षापासून शेतकरी राजधानीला धडाका मारत आहे , ते म्हणाले. दिल्लीच्या सीमेवर तो उपोषणाला बसलेला आहे आणि या शेतकऱ्याला दिल्ली प्रवेश देत नाही. कवी महेश मोरे, प्रशांत झिलपे,शैलजा कारंडे, कवी नीलम माणगावे, मंदा नांदुरकर, राजेंद्र सोमवंशी यांनी विविध विषयावरील कविता मांडून उपस्थितांचे हृदय जिंकले. साहित्य रसिकांनी या निमंत्रितांच्या कवी संमेलनाला चांगली दाद दिली.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. २३ फेब्रुवारी २०२५



## जिल्हा पत्रकार संघाच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी प्रविण पोकळे

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने नुकत्याच जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून यामध्ये आष्टी तालुकाध्यक्ष पदी प्रविण राम पोकळे यांची नियुक्ती केली आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे.पत्रकार प्रविण पोकळे यांची तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे लोकनेते आ.सुरेश धस,माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ.बाळासाहेब आजबे, माजी आ.साहेबराव दरेकर,युवा नेते जयदत्त धस, युवा नेते सागर धस,जि. प.माऊली जरांगे,नगराध्यक्ष जिया बेग,गणेश शिंदे, उद्योजक बंडू तोडकर,आष्टी तालुका पत्रकार संघ,आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, पुरोगामी पत्रकार संघ,प्रेस क्लब, बेलगाव ग्रामस्थ,मित्रपरिवार यांच्यासह राजकीय, सामाजिक,व्यापारी सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# बी एड कॉलेज परिसरात माजी सैनिकांनी केलेल्या अतिक्रमणासह सर्व शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे काढण्याचे राज्य शासनाचे आदेश

## कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईतील बी एड कॉलेज परिसरात माजी सैनिकांनी केलेल्या अतिक्रमणा सह सर्व शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे काढण्याचे राज्य शासनाचे आदेश आले असल्याने शहरातील बहुतांशी शासकीय जागा या सार्वजनिक बांधकाम विभाग ताब्यात घेवून त्या ठिकाणची अतिक्रमणे काढली जाणार आहेत तसे आदेश राज्य सरकारचे असून शहारातील सर्व शासकीय जागांवरील अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण निष्काशीत करावे अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने पोलिस बंदोबस्तात ही अतिक्रमणे काढली जाणार आहेत अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागो कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांनी दिली आहे.

अंबाजोगाई शहरातील बहुतांशी वस्त्या आणि गल्ल्या या शासकीय जागांवर अतिक्रमण करुन वसलेल्या आहेत. ज्यामध्ये सदर बाजार भागातील फ्लॉवर्स क्वार्टर, सब जेल सदर बाजार, अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील वसलेली माजी सैनिकांची वसाहत, यशवंतराव चव्हाण चौक परिसरातील दुध डेअरी बाजूची वस्ती अशा इतर जागांचा यात समावेश आहे. राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने शहरातील शासकीय जागेवरील आणि विशेषत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असून हे अतिक्रमण तात्काळ निष्काशीत करुन सर्व शासकीय जागा ताब्यात घेण्यात याव्यात असा शासन आदेश दि. २३ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित झालेला असून त्याचा शासन निर्णय क्रमांक हा सां.ब.ज -२०२४ / प्र.क्र. १७९ / मिव्य १ असा आहे. त्यानुषंगाने सदरील शासन निर्णयात स्पष्ट केले आहे की सार्वजनिक बांधकाम विभागांच्या जागावर अतिक्रमण होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे तसेच सार्वनिक बांधकाम विभागाच्या भुखंडावरील/ जमीनीवरील अस्तित्वातील अतिक्रमणे तात्काळ निष्काशीत करण्यात यावीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेची खाजगी व्यक्ती / संस्था / महामंडळे तसेच शासनाचे इतर विभागाकडून कोणत्याही कारणास्तव मागणी प्राप्त झाल्यास सदर जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यास त्यास शासन मान्यता घेणे आवश्यक राहील यापुढे शासनाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय कोणालाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आख्यारितील जमीनीचे हस्तांतरण अथवा भाडयाने दिल्याचे आढळल्यास संबंधीतीविरुद्ध व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल असा आदेश महाराष्ट्र शासनाचे उपसचिव निरंजन तेलंग यांनी दिला आहे. त्यानुषंगाने अंबाजोगाई शहरातील बहुतांशी भाग हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अख्यातरित येतो त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे ज्यामध्ये मांजरा वसाहत आणि सदर बाजार भागातील फ्लॉअर्स क्वार्टर या ठिकाणच्या अनेक शासकीय निवासस्थानामध्ये खाजगी व्यक्तींनी शिरकाव करुन जागा बळकावल्या आहेत त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला आहे.

या सर्व विषयाच्या अनुषंगाने अंबाजोगाई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांनी शासन आदेशाचा आधार घेवून अंबाजोगाई शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आखतरितील सर्व अतिक्रमणे तात्काळ काढून घ्यावीत असे आवाहन केलेले आहे. अन्यथा पोलिस बंदोबस्तात अतिक्रमणे काढली जातील व होणार्या नुकसानीस संबंधीत अतिक्रमणधारक जबाबदार राहील याची नोंद घ्यावी असे कळविले आसुन काढण्यात आलेल्या अतिक्रमना नंतर सर्व शासकीय जागा या शासन विविध प्रकल्प उभा करून विकसित करणार आहे. अतिक्रमण ही अंबाजोगाई शहरातील प्रमुख समस्या बनली आहे त्यामुळे अतिक्रमण काढवीत अशी मागणी स्वतः विविध टॅक्स भरणाऱ्या सामान्य जणातून पुढे येवू लागली आहे.

**सर्वात मोठा फटका बसू शकतो तो माजी सैनिक कॉलनीला**

मागील ७ ते ८ वर्षात अभियांत्रिकी महाविद्यालया समोरील बी एड कॉलेज च्या परिसरात शहरातील व बाहेरील माजी सैनिकांनी एकत्रित येऊन संघटनेच्या नावाने सर्व प्रथम मोकळी जागा ताब्यात घेतली आणि त्यात प्लॉट पाडून त्यात त्यावर चक्क २ मजल्या पर्यंत बांधकामे केली. व पाहता पाहता त्या ठिकाणी माजी सैनिक वसाहत अस्तित्वात आली आहे त्या वसाहतीला मूळ जागा धारकांची, राज्य सरकारची किंवा इतर कुठल्याही शासकीय कार्यालयाची परवानगी नसताना ही वसाहत उभी टाकली आहे. त्या ठिकाणी न्यायालयात माजी सैनिकांच्या विरोधात निकाल गेलेला आहे. राज्य शासनाच्या आदेशा नुसार या ठिकाणची अतिक्रमणे काढल्या गेली तर सर्वाधिक फटका हा माजी सैनिक कॉलनीला बसणार आहे.

## श्रीस्वामी अमृतभारती माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार अमृता व सुळ आदिती यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बांडराव सर,प्रमुख पाहुणे म्हणून.प्राचार्य अशोक पवार सर,नजान सर,मुळे सर,जरे सर,भोसले सर,श्रीमती गाडे मॅडम,डांबे सर हे होते.कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती देवीच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व श्रीफळ फोडून केली.दहावीतील विद्यार्थिनी मोरे दीक्षा,पवार पूजा, आलिशा भवर,खटावकर प्रतीक्षा, सारगुडे



श्रावणी,वर्ग पाचवी ते दहावीतील विद्यार्थी- विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाप्रसंगी मनोगत व्यक्त करून परीक्षेस शुभेच्छा दिल्या.तसेच प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.बांडराव सरांनी विद्यार्थ्यांनी पेपर कसे लिहावे व वेळेचे नियोजन पेपर सोडवताना कसे करावे याविषयी बहुमोल अशी माहिती दिली.जीवनात यशस्वी कसे व्हावे याविषयी यशाचे मूलमंत्र काही देऊन त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस एक सुंदर असे नाट्यपद बगळ्यांची माळ फुले अजूनही आंबरात गाऊन व बाप ही कवितेचे गायन करून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जरे अतिशा या विद्यार्थिनीने करून शेवट पसायदानाने करण्यात आला.

## केरळ येथील राष्ट्रीय योगासन स्पर्धेत बीडचे भूमिपुत्र योगेश्वर सानप व अमोल मस्के यांना सिल्व्हर मेडल

पाटोदा । प्रतिनिधी

केरळ योग असोसिएशन, केरळ स्टेट स्पोर्ट्स कौन्सिल आणि योगा फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४९ व्या वरिष्ठ गट राष्ट्रीय योगासन क्रीडा स्पर्धा दिनांक १३ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान तिरुअनंतपुरम केरळ येथे पार पडल्या. या स्पर्धेत बीड चे भूमिपुत्र श्री योगेश्वर अंकुश सानप (सौताडा)व श्री अमोल भारत मस्के (पालवन) यांनी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले व सलग तिसऱ्यांदा सिल्व्हर मेडल मिळवले. या दोघांची निवड व्हिएतनाम येथे होणाऱ्या अकराव्या आंतरराष्ट्रीय स्पर्धे साठी भारतीय संघात झाली असून या स्पर्धेत ते भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करतील . सदर स्पर्धेत भारत देशाच्या विविध राज्यातील सुमारे ९०० खेळाडू सहभागी झाले




होते. शासकीय सेवेत कार्यरत असतानाही शासकीय सेवेचा व्याप सांभाळून बीड च्या भूमिपुत्रांनी डंका वाजवून बीड जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेल्याबद्दल त्यांचे भारतीय संघाचे प्रशिक्षक श्री चंद्रकांत पांगारे सर, राष्ट्रिय योग खेळाडू श्री शिवाजी घोडके, श्री विकास गवते सर, ह. भ. प. दिगंबर महाराज काष्टे, बीड जिल्हा योग असोसिएशन चे सचिव श्री विनायक वझे सर , सर्व हितचिंतक मित्र परिवार व विविध सामाजिक संस्था यांनी अभिनंदन केले व पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. योगा सारख्या पारंपारिक भारतीय खेळामध्ये बीड जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उंचावल्याबद्दल या दोन्ही खेळाडूंचे सर्वत्र कौतुक केले जात असून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

पान ६ वरून...

### शिवजयंती निमित्त घेण्यात

साखरे, समर्थ विलास पानढवळे,सिद्धी संदिप जोशी,शिवप्रसाद गणेश रोडगे,दिनांक विजयकुमार भुमकर,सर्वेश चंद्रकांत थळकरी,पौरवी बापुसाहेब भुसारी,अंकिता देविदास कदम,अवनी अरूण नांदे,श्रिशा श्रीरंग तानगे या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होत परितोषिक मिळवले.

वक्तृत्व स्पर्धेचे विजेते यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसाचे मानधन व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.प्रथम क्रमांकाचे बक्षिस स्पर्श डेव्हलपर्सचे प्रभु पाटिल,द्वितीय क्रमांक बक्षिस अँड.हनुमंत जाधव,तृतीय क्रमांक बक्षिस गणेश रोडगे व उत्तेजनार्थ बक्षिसबक्षिस पं.स.सदस्य उमाकांत भुसारी तर्फे देण्यात आले.बक्षिसाचे स्वरुप प्रथम क्र.५०० रुपये व प्रशस्तीपत्र,द्वितीय क्र.२५१ रुपये व प्रशस्तीपत्र,तृतीय क्र.१०१ रुपये व प्रशस्तीपत्र उत्तेजनार्थ १०१ रूपये व प्रशस्तीपत्र असे होते.याप्रसंगी इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक श्री बापुसाहेब भुसारी,सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते व मान्यवरांच्या उपस्थितीत वक्तृत्व स्पर्धेचे बक्षिस वितरण समारंभ उत्साहात पडला.

### श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठान

दि. २५ रोजी ह भ प श्रीमंत महाराज तांदळे व ह भ प बद्रीनाथ महाराज नाथजोगी यांचे प्रवचन तर ह भ प नवनाथ महाराज शास्त्री ,मठाधिपती, श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ संस्थान, भालगाव यांचे कीर्तन होणार आहे. बुधवार दि. २६ रोजी ह भ प महामंडलेश्वर स्वामी शिवरुद्रनंद, महाराज काशी व श्रीसंत भगवान बाबा प्रतिष्ठान, बीड यांचे प्रवचन सायंकाळी ६.३० ते ८.३० महामंडळेश्वर स्वामी १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज मठाधिपती, इंदुवासीनी संस्थान , गणेशानंद गड, पिंपळनेर, यांचे कीर्तन होणार आहे .गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ११ ते १ दरम्यान कुटचिंतन प्रवक्ते ह भ प महादेव महाराज राऊत ( म्हाळसजवळेकर )यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. कीर्तनानंतर निमंत्रित मान्यवरांचा सत्कार आणि त्यानंतर महाप्रसादाने कीर्तनाची सांगता होणार आहे. सप्ताहातील किर्तन ,प्रवचन व सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### वैद्यनाथ संघ विजेता तर

सामनावीर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेमध्ये सनरायझर्स संघाला आपल्या दमदार फलंदाजी आणि गोलंदाजीने अंतिम फेरीपर्यंत नेलेल्या डॉ.राजेश इंगोले यांना अंतिम फेरीत मात्र आपल्या संघास विजय प्राप्त करून देण्यात अपयश आले. पाच पैकी चार सामन्यांमध्ये सामनावीराचा पुरस्कार पटकविणारे डॉ.राजेश इंगोले यांना स्पर्धेतील द मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेयर या अत्यंत महत्त्वाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ.राजेश इंगोले यांनी पाच सामन्यात ६७ च्या सरासरीने २५० धावा तर गोलंदाजी करताना चार सामन्यांमध्ये सात बळी मिळवून अष्टपैलू कामगिरी केली त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. हा सामना पाहण्यासाठी अनेक डॉक्टर्स तसेच क्रिकेटप्रेमींनी मैदानावर गर्दी केली होती. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, संपादक बालाजी तोंडे, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सामन्यासाठी पंच म्हणून बिंबीसार वाघमारे व संघर्ष इंगळे, स्कोअरर म्हणून चाफा भडके व प्रा.अनंत कांबळे तर समालोचक म्हणून डॉ.देवराव चामनर, डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.संदीप जैन यांनी कामगिरी बजावली. या स्पर्धांच्या यशस्वितेसाठी एँपाच्या कार्यतत्पर अध्यक्षा डॉ.सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ.सुनील नांदलगावकर, सचिव डॉ.ऋषिकेश घुले, क्रीडासचिव डॉ.बी.डी.माळवे, डॉ.नजीरूद्दीन, डॉ.विवेक मुळे यांनी परिश्रम घेतले. क्रीडासचिव डॉ.बी.डी.माळवे यांनी यावेळी अत्यंत कल्पकतेने डॉक्टर्सच्या क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले, त्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सहृदय सत्कार करण्यात आला. योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानात सुरू असलेल्या ह्या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व अनोख्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाल्या.

### प्रधानमंत्री आवास योजनेसाठी

जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. उल्हास गंडाळ, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मोकाटे आणि संबधित अधिकारी, कर्मचारी, लाभार्थी उपस्थित होते. घरकुल योजनेसाठी उत्कृष्ट काम करणा-या कर्मचा-यांचा जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रदर्शन जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगितादेवी पाटील यांनी केले. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा - २) च्या अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृती पत्राचे वितरण तसेच १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण कळ दाबून केले. हा कार्यक्रम पुणे येथून दुरदृश्य प्रणालीव्दारे प्रक्षेपित करण्यात आला.

### माजलगाव मठात २८ एप्रिल

२० मे २०२५ जंगम खर्चासाठी तपोरत्नां वैदिक पाठशाळेचे शिबीर २१ दिवस होणार आहे.मध्ये शिबिरार्थी सामाजिक प्रार्थना, रुद्राभिषेक आणि महापूजा,विधायक मार्गदर्शन केले जाईल.अधिक शिबिरार्थींना रुद्रपठणाचे अध्ययन केले जाते. आदर्श जीवन जगण्याची पध्दती संस्कारही तुम्हाला दिली जाते.एकंदर वैदिक परंपरेतील विधी त्याचे मूल्य आणि महात्म्य पटवून दिले जाईल. २१ दिवस संपूर्ण गुरूद्वारे सखोल अध्यात्म ज्ञान दिले जाईल,अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.''

## युसूफवडगांव विद्यालयाचे नॅशनल सायन्स ओलंम्पियाड स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसूफवडगांव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश प्राप्त केले असुन विद्यालयाच्या एकूण सात विद्यार्थ्यांनी यामध्ये यश प्राप्त केले असून त्यांनी सुवर्णपदक पटकावले आहेत.



यामध्ये इयत्ता दहावी मधून प्रथम चि.हर्षवर्धन गोरख कोरसळे,द्वितीय चि.रणवीर मन्मथ पाटील,तृतीय कु.मोहिनी श्रीमंत चोपणे तर अकरावी विज्ञान मधून कु.नंदिनी जयराज मुकदम तसेच बारावी विज्ञान मधून प्रथम कु.प्रतीक्षा वैभव पानढवळे,द्वितीय कु.सिद्धी जीवनराव गायकवाड,तृतीय कु.साक्षी हनुमंत पवार या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावले असून या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत गोल्ड मेडल तसेच अँप्रिसिएशन प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. नुकताच या परीक्षेचा निकाल लागला असून तसे एन.एस.ओ.नवी दिल्ली मार्फत विद्यालयास कळविण्यात आले आहे.याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव दीपकदादा घुमरे,अध्यक्ष सुकाळे यु.बी,प्राचार्य भोसले.यु.ए,उपप्राचार्य श्रीमती जाधवर एम.एस,पर्यवेक्षक खरबड आर.बी,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख चव्हाण.एन.एन तसेच शिक्षक पालक व नागरिकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयांमध्ये रंगोत्सव इंटरनॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन स्पर्धा संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयांमध्ये इंटरनॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन रंगोत्सव स्पर्धा परीक्षा संपन्न झाली.कलरिंग कोलाज हस्ताक्षर स्पर्धेमध्ये सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.सुंदर असे चित्र रंगवून कोलाज मेकिंग करून तसेच हस्ताक्षर सुंदर काढून सर्वांनी पेपर अतिशय व्यवस्थितपणे दि.१७/०२/२०२५ सोमवार या दिवशी केले.या परीक्षेचा निकाल साधारणतः मे महिन्यामध्ये लागतो. या सर्व पेपरचे मूल्यांकन राष्ट्रीय रंगोत्सव आर्ट कॉम्पिटिशन द्वारा मुंबई येथे केले



जाते. या परीक्षेमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या व यशस्वी विद्यार्थ्यांना विविध प्रकारची स्पर्धा पारितोषिके प्रमाणपत्र व अवॉर्ड दिले जातात.या परीक्षेचे सर्व नियोजन कलाशिक्षक बांडराव सरांनी शालेय लेव्हलवर केले.शाळेचे मुख्याध्यापक पवार सर यांनी त्यांना सहकार्य करून ही परीक्षा अतिशय व्यवस्थितपणे पार पाडली. विद्यालयातील स्तुत्य उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष श्री ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज सरपंच व उपसरपंच सचिव प्रताप पवार व सर्व शिक्षक वृंद पिंपळवंडी व ग्रामस्थांनी कौतुक केले.

## कवयित्री कै.शैलजा यांची कविता अंतर्मनाला चालना देणारी व प्रेरणादायी–माजी आ.श्रीकांत जोशी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य प्रा.अजय मधुकरराव चौधरी यांच्या पत्नी तथा कवयित्री कै.शैलजा अजय चौधरी यांच्या शैलाच्या कविता या काव्यसंग्रहाचा दिमाखदार प्रकाशन सोहळा येथील हॉटेल इट अँड स्टे येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबानगरीतील सुप्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ तथा साहित्यिक डॉ.शुभदा लोहिया या उपस्थित होत्या. तर मंचावर मराठवाडा पदवीधर मतदार संघ, छत्रपती संभाजीनगरचे माजी आमदार श्रीकांत जोशी, पुणे येथील सुप्रसिद्ध आय.टी.उद्योजक अनिल चैतन्य, प्रकाशक प्रा.अजय चौधरी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांसह सिद्धराज देशपांडे, माजी प्राचार्य रा.गो.धाट, ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ प्रा.डॉ.शरद हेबाळकर, डॉ.एन.पी.देशपांडे, व्यंकटेश कुलकर्णी, प्रवीण सरदेशमुख, प्रा.सौ.अर्चना जोशी, जयेंद्र कुलकर्णी, विश्वजीत धाट आदी मान्यवरांचा चौधरी कुटुंबियांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. यानंतर सर्व उपस्थित मान्यवरांनी कै.शैलजा चौधरी यांना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण केली. प्रास्ताविक प्रा.अजय चौधरी यांनी केले. ते म्हणाले की, माझी पत्नी कै.शैलजा ही केवळ माजी सहचारिणीच नव्हती. तर ती एक खंबीर स्त्री होती. जिने आपल्या अल्पायुषी जीवनात नौकरी सांभाळत संपूर्ण कौटुंबिक जबाबदाऱ्या अगदी यशस्वीपणे व समर्थपणे निभावल्या. हा संसाराचा गाडा हाकत असतानाच तिने कालसुसंगत रांगोळ्या काढणे, बॅडमिंटन खेळणे, संगीत शिकणे, चित्र काढणे, शाडूच्या माती पासून गणपती तसेच विविध पर्यावरण पूरक मूर्ती - शिल्पे तयार करणे, तसेच कविता करणे इत्यादी विविध क्षेत्रातील छंद जोपासले होते. साधारणतः वर्ष २०१४ पासून त्यांनी कविता लिहायला



**कवयित्री कै.शैलजा चौधरी यांच्या शैलाच्या कविता काव्यसंग्रहाचा मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा**

सुरूवात केली. आज तिने लिहिलेल्या कवितांचा प्रकाशन सोहळा संपन्न होत आहे. तिच्या अचानक जाण्याने एक चैतन्यमय झळाळी थांबली, मात्र तिने केलेले कर्म ती इथेच ठेवून गेली, अशा भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या. त्यानंतर कै.शैलजा चौधरी यांचा संपूर्ण जीवनपट दाखविणारी एक चित्रफित एलईडी स्क्रीनवर उपस्थितांना दाखविण्यात आली व त्यानंतर शैलाच्या कविता या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. कै.शैलजा यांचे आतेभाऊ तथा पुणे येथील सुप्रसिद्ध आय.टी.उद्योजक अनिल चैतन्य आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की, कै.शैलजा यांच्या कवितांमध्ये साधेपणा व गहनता पहावयास मिळते. तिच्या शब्दांमध्ये साधेपणा आहे. त्यांची प्रत्येक कविता वेगवेगळ्या वेळेला वेगवेगळी जाणवते. हा त्यातील दैवीपणा आहे. या कविता स्वतःच्या मनातील तक्रारी करणाऱ्या कविता नाहीत तर सुख काय आहे हे सांगणाऱ्या या कविता आहेत, अशा भावना व्यक्त करून त्यांनी सुखानुभव या कवितेचे रसग्रहण केले. डॉ.सौ.कल्पनाताई चौसाळकर आपल्या मनोगतात म्हणाल्या की, कै.शैलजा या सर्जनशीलता, नाविन्यता आणि उत्साह याचे मूर्तिमंत उदाहरण होत्या. त्या प्रचंड मेहनती होत्या. एक स्त्री म्हणून त्यांनी त्यांच्या कार्यालयातून कधीही सवलत घेतली नाही. नौकरीच्या सुरूवातीच्या काळात अत्यंत कठीण परिस्थिती होती, तरीही त्यांनी नेटाने आपले कार्य केले. त्या एक उत्तम सुगरण, अतिशय संवेदनशील असे व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांच्या मनातील अनेक गुजगोष्टी त्यांच्या कवितेच्या माध्यमातून समोर आल्या, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रमुख अतिथी माजी आमदार श्रीकांत जोशी म्हणाले की, कै.शैलजा यांच्या सर्वच कविता या अंतर्मनाला चालना देणाऱ्या व अत्यंत प्रेरणादायी आहेत. या कवितांचा वाङ्मयीन दर्जा अत्यंत उच्च आहे. या सर्व कवितांचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे त्यात असलेली सकारात्मकता होय. आगामी काळात या सर्व कविता सर्वोत्तम संगीतकारांकडून संगीतबद्ध करून गीतांच्या रूपातून आपण सर्वांसमोर आणू अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली. भौतिकदृष्ट्या त्या किती वर्ष जगल्या त्यापेक्षा त्या पुढे कितीतरी वर्ष कवितेच्या रूपाने जगणार आहेत असे भावोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले. याप्रसंगी प्रा.चौधरी यांचे सुपुत्र चि.सोहम व चि.प्रसीद, सुनबाई सौ.पद्मश्री चौधरी, डॉ.सौ.कल्पनाताई चौसाळकर, प्रा.दुर्गादास चौधरी, प्रा.सौ.अर्चना जोशी, व्यंकटेश कुलकर्णी, सिद्धराज देशपांडे आदी मान्यवरांनी कै.शैलजा यांच्या अनेक कवितांचे रसग्रहण करून आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन डॉ.गौरी कुलकर्णी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सोहम चौधरी यांनी मानले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी चौधरी कुटुंबियांवर प्रेम करणारे अंबानगरीतील तसेच बाहेर गावाहून आलेले सर्व स्नेही जन, मित्रपरिवार, आप्त - नातेवाईक, शहरातील अनेक मान्यवर प्रतिष्ठित मंडळी, प्राध्यापक साहित्यिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.अजय चौधरी यांचे सुपुत्र चि.सोहम व चि.प्रसीद व चौधरी परिवारातील सदस्य यांनी पुढाकार घेतला.

# कृषीपंपांच्या मोफत विजेचा निर्णय मुख्यमंत्र्यांचा; कृषिमंत्र्यांचे थकीत बिलावर उत्तर

पुणे : शेतकऱ्यांना पुढील पाच वर्ष मोफत वीज मिळणार का हा विषय मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीतला आहे, असं म्हणत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी थकीत बिलावरून मुख्यमंत्री फडणवीसांकडे बोट दाखवलं आहे. कृषिमंत्री शनिवारी (दि.२२) कोल्हापुरात होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

राज्य सरकारने शेतकऱ्यांना कृषीपंपासाठी मोफत वीज देण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु निवडणुकीच्या नंतर काही शेतकऱ्यांना थकीत बिल पाठवण्यात आलं असून तातडीने वीज बिल भरण्याची तंबी देण्यात आल्याची बातमी समोर आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये वीज बिलावरून संभ्रम निर्माण झाला आहे. याबद्दल राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असताना कृषिमंत्र्यांनी मात्र मुख्यमंत्र्यांकडे बोट दाखवले. विधानसभा निवडणुकीला डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना राबवली. या योजनेतून ७.५ एचपीच्या कृषीपंपासाठी शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला. राज्यात ४६ लाख ७.५ एचपी कृषीपंपधारक शेतकरी असल्याने त्यासाठी १४ हजार ७६१ कोटी रुपयांचा बोजा राज्य सरकारवर पडला. त्यावरून महायुती सरकारने निवडणुकीच्या रणांगणात शेखी मिरवली. परंतु निवडणुकी होताच शेतकऱ्यांना थकीत बिल मिळत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, अद्याप राज्यातील किती शेतकऱ्यांना थकीत बिल पाठवण्यात आले आहेत, याबद्दल अधिकृत माहिती समोर आली नाही. तसेच ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणविसांकडून भूमिका स्पष्ट करण्यात आली नाही. त्यामुळे




शेतकऱ्यांची मात्र गोची झाली आहे. मात्र महावितरण कंपनीचे अधिकारी मात्र अशाप्रकारे शेतकऱ्यांना थकीत बिल पाठवले जात नसल्याचा दावा करत आहेत.

## शेतकऱ्यांमध्ये सरकारने फसवणूक केल्याची भावना

राज्यात कृषीपंपासाठी दिवसा वीज मिळावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. परंतु सध्या राज्यात रात्री कृषी पंपासाठी वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्री बेरात्री शेतात जावं लागतं. त्यामुळे शेतकरी दिवसा वीज द्या, अशी मागणी करत आहेत. परंतु राज्य सरकारने त्यावर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोफत विजेचं घोडं दामटवून शेतकऱ्यांची बोळवण गेली. आता मात्र शेतकऱ्यांना वीज पाठवली जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारने फसवणूक केल्याची भावना आहेत.

## पपईचा आकार बिघडण्याची कारणे आणि उपाय



शेतकरी बांधव फळे व भाजीपाला लागवडीतून अधिक नफा कमावतात, मात्र कधी तापमानात घट झाल्यामुळे तर कधी खताच्या कमतरतेमुळे पिकाची नासाडी होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यांना त्यांच्या पिकांचे चांगले उत्पादन मिळत नाही. रात्रीचे तापमान कमी झाल्यावर, जास्त आर्द्रता आणि नायट्रोजनची पातळी वाढली की त्याचा पपई पिकावर परिणाम होत असल्याचे अनेकदा दिसून येते. त्यामुळे फळांचा आकार बदलून फळांचे भाव खाली येतात व शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही.

पपई फळातील रोगाची कारणे :जेव्हा जमिनीत बोरॉनची कमतरता असते, तेव्हा पपई पिकावर रोग उद्भवतात. याशिवाय जेव्हा हवामान कोरडे होते, तेव्हा पपई पिकावर हा प्रकार अधिक दिसून येतो. शास्त्रज्ञ म्हणतात की जेव्हा जमिनीत बोरॉनची कमतरता असते तेव्हा झाडाची वाढ थांबते. उलटपक्षी, जवळच्या ऊतींमध्ये वाढ होते. त्यामुळे फळे येतात आणि खराब होतात.

पपईच्या फळांचा आकार बिघडण्याची कारणे :बोरॉनच्या कमतरतेमुळे, प्रभावित फळामध्ये बियाणे तयार होत नाही किंवा कमी विकसित होते. झाडांच्या वाढीवर परिणाम होऊन झाडांची उंची लहान होते. अपरिपक्व फळाच्या पृष्ठभागावर दूध दिसून येते. फळ कडक होते, अशी फळे लवकर पिकत नाहीत आणि चवहीन असतात फळाचा आकार खराब होतो. झाडांवरून फुले पडू लागतात.काय कराल उपाय ? : अशा स्थितीत पपई लागवडीत सेंद्रिय खतांचा मुबलक वापर करावा. माती परीक्षण करून घ्या. बोरॉनचे प्रमाण जमिनीत तपासा.

# शेततळ्यासाठी जागा निवडताना काळजी घ्या

शेततळ्याचा मुख्य उद्देश म्हणजे पावसाचे वाहून जाणारे पाणी साठविणे आणि त्याचा वापर ज्या वेळी पिकाला पावसाची किंवा पाण्याची गरज असेल त्यावेळी संरक्षित पाणी देण्यासाठी केला जावू शकतो. तसेच वर्षभर लागणाऱ्या पाण्याचा वापर देखील शेततळ्याच्या माध्यमातून केला जाऊ शकतो. शेततळ्याच्या कार्यक्षम वापर व त्यातील पाण्याचा चांगला वापर करण्यासाठी शेततळ्याच्या बांधणी पासून विशिष्ट बाबींचे नियोजन करणे महत्त्वाचे असते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जागेची निवड. जेथे सहजासहजी विहीर खोदणे शक्य होत नाही तेथे वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी शेततळे तयार करून पाणी साठविता येते. पावसाच्या अनियमितपणामुळे जेव्हा पावसाअभावी पिकास ताण पडतो, अशा वेळी या तळ्यात साठविलेल्या पाण्यामधून एक किंवा दोन पाणी पिकास देऊन उत्पादन वाढण्यास मदत होऊ शकते. काही क्षेत्र रब्बी पिकाखालीही आणता येऊ शकते. जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी, मत्स्य उत्पादनासाठी, पिण्यासाठी, घरगुती उपयोगासाठी व जनावरांना पाणी पिण्यासाठी शेततळ्याचा उपयोग होऊ शकतो. ज्या ठिकाणी जमीन जवळ जवळ सपाट असेल त्या ठिकाणी खड्डा खोदून तळे तयार करावे, तर काही ठिकाणी नैसर्गिक घळ अथवा ओघळ अडवून किंवा नाला शेताजवळून वाहत असल्यास त्याला आडवून शेततळ्यात पाणी साठवता येते.शेततळ्यासाठी जागेची निवड : १. शेततळ्यासाठी ज्या क्षेत्रातून पावसाचे वाहून जाणारे पाणी येणार असेल त्या क्षेत्राचा उतार जवळपास चार टक्क्यांपर्यंत असावा. घळीला आडवा भराव घालून शेततळे तयार करणार त्याच्या वरच्या बाजूला घडीला चार ते सहा टक्के पर्यंत उतार असावा. म्हणजे तळ्यात साठवल्या जाणाऱ्या पाण्याला खोली जास्त मिळेल. २. शेतीचा क्षेत्राचा विचार केला असता शेतात एका ठिकाणी पावसाचे पाणी गोळा होईल अशी जागा शेततळ्यासाठी निवडावी. म्हणजेच पृष्ठभागावरून मिळणारा अपधाव शेत तळ्यामध्ये साठवला जाईल.

३. शेततळ्याची जागा निवडताना अशी निवडावी की, खोदायचा होणारा खर्च हा कमीत कमी होईल. शेततळ्यासाठी पाणी साठवणूक घनता आणि मातीकाम घनता यांचे गुणोत्तर एक पर्यंत असावे तर घळीला आडवा भराव घालून केलेल्या शेततळ्यासाठी हेच गुणोत्तर पाच ते दहा पर्यंत असावे. ४. शेततळ्याच्या साठलेल्या पाण्याचा पुनर्वापर सोयीस्कर करता येईल असे ठिकाण निवडावे. ५. शेततळ्याच्या आराखडा शेतातून मिळणाऱ्या पावसाचे वाहून जाणारे पाणी वर आधारित असावा किंवा शेतकऱ्यांची वर्षभरातील पाण्याची गरज किती आहे.संपूर्ण पावसाचे वाहून जाणारे पाणी साठवणे शक्य नाही त्या ठिकाणी हा विचार करावा त्यानुसार शेतकऱ्याची आखणी करावी. ६. शेततळ्यातून साठवलेले पाणी बाष्पीभवन आणि झिरपण्याद्वारे जाणार याचा अंदाज करून शेततळ्याचा आराखडा तयार करावा. जमिनीचा उतार आणि उपलब्ध पाण्याचा स्त्रोत अनुसार क्षेत्राचे प्रकार पडतात. ७. शेततळे तयार करताना त्यात येऊ शकणारी एकूण पाणी, शेततळे ज्या जागेवर तयार करायचे आहे तेथील जमिनीचा प्रकार, पाण्याची एकूण गरज, बाष्पीभवनाद्वारे होणारा पाण्याचा व्यय या गोष्टींचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. ८. शक्यतो शेततळ्याची जागा शेतातील सर्वात खोलगट भागाची अथवा टोकाचीअसावी. ९. शेतातल्या खाली जाणारी जमीन लागवडीयोग्य नसावी व या जागेतून पाझर देखील कमी असावा.



# रेशीम कीटकांच्या आरोग्यासाठी उपाययोजना

रेशीम शेती उद्योगामध्ये वर्षभर रेशीम कोष निर्मितीसाठी बॅच घेतल्या जातात. वर्षभर रेशीम कीटकांचे संगोपन सुरू असल्याने रेशीम कीटकांवर रोगजंतूंचा प्रादुर्भाव दिसून येतो. रेशीम कीटक हे पर्यावरणीयदृष्ट्या फार संवेदनशील असतात. रेशीम अळीवर प्रामुख्याने ग्रासेरी, फ्लॅचेरी, मस्कार्डीन आणि पेब्रिन या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. या रोगांच्या प्रादुर्भाव रेशीम कीटकांवर झाल्यामुळे रेशीम कोष उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम दिसून येतो. रेशीम कीटकांमध्ये मरतुक येते. कोषाची दर्जा खालावतो. असे विविध प्रकार दिसून येतात. त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान संभवते. त्यासाठी रेशीम कीटकांवर येणाऱ्या विविध रोगांच्या प्रादुर्भावाची लक्षणे माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून वेळीच उपाय करून नुकसान टाळता येईल.

ग्रासेरी : रोगकारक घटक – बॉम्बिक्स मोरी न्यूक्लिअर पॉलीहेड्रोसिस व्हायरस. रोगाचा प्रादुर्भाव वर्षभर दिसून येतो. मात्र उन्हाळा आणि पावसाळ्यात तीव्रता अधिक असते.

प्रादुर्भावाची कारणे – खराब तुती पानांचे सेवन. रोगग्रस्त अळ्यांद्वारे सोडलेल्या दुधासारख्या पांढऱ्या द्रव पदार्थाच्या संपर्कात आल्याने. दूषित रेशीम अळी संगोपन गृह आणि उपकरणे वापरल्याने.

पोषक घट : उच्च तापमान, कमी आर्द्रता आणि खराब दर्जाच्या तुती पानांचे सेवन. लक्षणे



– संक्रमित अळ्यांची त्वचा चमकदार होते. अळीच्या त्वचेवरील आवरण नाजूक होते. संक्रमित अळ्यांच्या त्वचेवर आंतरखंडीय सूज दिसून येते. अळ्या कातेवर जाण्यास व कातेमधून बाहेर पडण्यात अयशस्वी होतात. संक्रमित अळ्यांची त्वचा पांढरी शुभ्र होते आणि सहज फाटते. त्यातून पांढरा दुधासारखा द्रव बाहेर येतो.

व्यवस्थापन : कीटक संगोपनगृहातील उपकरणे, संगोपन गृह व परिसराचे दोन वेळा निर्जंतुकीकरण करावे. आधीच्या बॅचमध्ये प्रादुर्भाव अधिक दिसून आला असेल तर, ०.३ टक्का विरवलेल्या चुन्याच्या द्रावणाने अतिरिक्त निर्जंतुकीकरण करावी. प्रत्येक बॅच घेताना स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी. संसर्गाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर रोगग्रस्त अळ्या गोळा करून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. प्रमाणित केलेल्या शिफारशीनुसार अंकुश किंवा विजेता पावडरची धुरळणी करावी. संगोपनगृहामध्ये योग्य तापमान आणि आर्द्रता राखावी.

हवा खेळती ठेवावी. रेशीम अळी संगोपन बेडमध्ये अळ्यांची जास्त गर्दी करू नये. रेशीम अळ्यांना चांगल्या प्रतीची तुतीची पाने पुरेशा प्रमाणात खाद्य म्हणून द्यावीत.मस्कार्डिन : रोगकारक घटक – पांढरा मस्कार्डीन हा बिव्हेरिया बॅसियाना या बुरशीमुळे होतो. रोगाचा प्रभाव हिवाळ्यात आणि पावसाळ्यात जास्त होतो.

प्रादुर्भाव कारणे : मृत रेशीम अळ्या या संसर्गाचा प्रमुख स्रोत आहेत. मृत रेशीम अळ्यांपासून निघणारे कोनिडिया आजूबाजूच्या वातावरण तसेच संगोपनगृह आणि संगोपन बेड दूषित करतात. संसर्ग तेव्हा सुरू होतो, जेव्हा हे कोनिडिया निरोगी रेशीम अळीच्या संपर्कात येतात.लक्षणे : अळ्यांची भूक मंदावते. त्या निष्क्रिय होतात. मरतुकीस आलेल्या अळ्या मऊ होतात. तोंडातून उलटीसारखा द्रव बाहेर येतो. प्रादुर्भावग्रस्त अळ्या मृत्यूनंतर सुरुवातीला मऊ होऊन काही वेळाने मायसेलियाच्या वाढीमुळे कडक बनतात. त्यांचा रंग पांढरा बनतो.

व्यवस्थापन : संगोपनगृहाचे व संगोपन उपकरणांचे दोन वेळा निर्जंतुकीकरण करावे. तुती बागेचे नियमितपणे निरीक्षण करून त्वरित कीड नियंत्रणासाठी उपाय करावेत.

रोगग्रस्त अळ्या उचलून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. पावसाळ्याच्या दिवसांत चुना पावडरची धुरळणी करून बेडवरील आर्द्रता नियंत्रित करावी. संगोपनगृहामध्ये योग्य तापमान आणि आर्द्रता राखावी. वेळापत्रकानुसार विजेता, अंकुश या जंतुनाशकांचा बेड निर्जंतुकीकरणासाठी वापर करावा.




### महत्वाच्या घटना

१४५५: पाश्चिमात्य देशातील पहिले छापील पुस्तक 'गटेनबर्ग बायबल' प्रकाशित झाले.
१७३९: चिमाजी अप्पाच्या वसई मोहिमेत मानाजी आंग्रे यांनी रेवदंड्यावर हल्ला चढवला.
१८८७: रिव्हेरा येथे या दिवशी भुकंप
१९०५: आजच्या दिवशी रोटरी इंटरनेशनल क्लब ची स्थापना.
१९४१: डॉ. ग्लेन सीबोर्ग यांनी प्लूटोनिअम हे मूलद्रव्य प्रथमच वेगळे केले.
१९४५: दुसरे महायुद्ध  रॉयल एअर फोर्सच्या विमानांनी जर्मनीतील फोर्झेम शहर बेचिराख केले.
१९४५: दुसरे महायुद्ध – पोलंडच्या पोझ्नान शहरात जर्मन सैन्याने शरणागती पत्करली.
१९४५: दुसरे महायुद्ध – अमेरिकन सैन्याने फिलिपाईन्सची राजधानी मनिला
१९४५: दुसरे महायुद्ध – इवो जिमाची लढाई  अमेरिकन नौदलाचे काही सैनिक (मरीन्स) प्रशांत महासागरातील माउंट सुराबाचीवर पोचले व त्यांनी तेथे अमेरिकन झेंडा उभारला. हे करीत असतानाचे त्यांचे छायाचित्र जगप्रसिद्ध झाले.
१९४७: आंतरराष्ट्रीय मानक संस्थेची स्थापना
१९५२: संसदेने कामगार भविष्य निर्वाह निधी विधेयक मंजूर केले.
१९६६: सीरियात लष्करी उठाव झाला.
१९७०: आजच्या दिवशी दक्षिण अमेरिकेतील एक देश गुयाना देशात प्रजेची सत्ता आली.
१९९६: कोकण रेल्वेच्या चिपळूण  खेड टप्प्यातील वाहतूकीचा शुभारंभ
१९९७: रशियाच्या 'मीर' या अंतराळस्थानकामधे आग लागली.
२०००: संस्कृत पंडित रा. ना. दांडेकर आणि काश्मिरी कवी रेहमान राही यांना साहित्य अकादमी ची फेलोशिप जाहीर
२००३: ग्रॅमी पुरस्कार चे वितरण करण्यात आले. नोरा जोन्स आणि जॉन मेयर यांना पुरस्काराने सन्मानित.
२००७: आजच्या दिवशी पाकिस्तान च्या शाहीन–२ चे चाचणी केल्या गेली.
२०१०: आजच्या दिवशी एम.एफ.हुसैन यांना भारताची नागरिकता प्रधान केल्या गेली.
२०१२: मेरीलँड मध्ये समलैंगिक विवाहाची अनुमती देणारा कायदा मंजूर झाला.
२०१४: ला रशिया च्या सोच्ची या शहरात हिवाळी ऑलिम्पिक चा समारोप करण्यात आला.
२०१६: डोनाल्ड ट्रंप यांनी नेवादा रिपब्लिकन ची प्राथमिक निवडणूक ४५.९.५% ने जिंकली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४: जगप्रसिध्द नाटककार शेक्सपिअरचा जन्म
१६३३: सॅम्युअल पेपिस – विख्यात इंग्रजी रोजनिशीकार व कुशल प्रशासक (मृत्यू: २६ मे १७०३)
१८५०: रिट्झ हॉटेल, लंडन आणि रिट्झ हॉटेल, पॅरिस चे निर्माते सीझर रिट्झ यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर १९१४ )
१८७६: देबुजी झिंगराजी जानोरकर ऊर्फ 'संत गाडगे महाराज' – कमालीचे अज्ञान, अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष सेवेचे व्रत घेतले आणि त्यासाठी कीर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरले. (मृत्यू: २० डिसेंबर १९५६)
१९१३: प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार – जादूगार (मृत्यू: ६ जानेवारी १९७१)
१९५४: आध्यात्मिक गुरु बाबा हरदेव सिंह यांचा जन्म.
१९६५: हेलेना सुकोव्हा – झेकोस्लोव्हाकियाची टेनिस खेळाडू
१९६५: अशोक कामटे – मुंबईच्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलिस कमिशनर (मृत्यू: २६ नोव्हेंबर२००८)
१९६८: भारतीय चित्रपट अभिनेत्री कृतिका देसाई खान यांचा जन्म.
१९५७: येरेन नायडू – तेलगु देसम पक्षाचे लोकसभेतील नेते (मृत्यू: २ नोव्हेंबर २०१२)
१९८३: भारतीय अमेरिकन कास्य कलाकार अजीज अंसारी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७७: कार्ल फ्रेड्रिक गाऊस – जर्मन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ, आर्किमिडीज व न्यूटन यांच्या तोडीचे गणितज्ञ, इलिप्टीक फंक्शन्स व नॉन युक्लिडियन जॉमेट्री इ. विषयांवर त्यांचा मोठा अभ्यास होता. (जन्म: ३० एप्रिल १७७७)
१७९२: सर जोशुआ रेनॉल्ड्स – ब्रिटिश चित्रकार व रॉयल ॲकॅडमीचे पहिले अध्यक्ष, व्यक्तिचित्रे काढण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी होती. (जन्म: १६ जुलै १७२३  प्लिम्प्टन, प्लायमाऊथ, इंग्लंड)
१९०४: महेन्द्र लाल सरकार – होमिओपॅथ, समाजसुधारक व विज्ञानप्रसारक, 'इंडियन असोसिएशन ऑफ कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' या संस्थेचे सहसंस्थापक, होमिओपाथीच्या प्रसारासाठी त्यांनी १८६८ मधे 'जर्नल ऑफ मेडिसीन' हे मासिक सुरू केले. (जन्म: २ नोव्हेंबर १८३३  पैकपारा, हावडा, पश्चिम बंगाल)
१९४४: लिओ हेन्ड्रिक आर्थर बेकेलँड – अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ, १९०९ मधे त्यांनी लाखेवर अनेक प्रयोग करुन 'बॅकेलाईट' नावाचा पदार्थ तयार केला. ही प्लॅस्टिक युगाची सुरुवात मानली जाते. (जन्म:१४ नोव्हेंबर १८६३  घेन्ट, बेल्जिअम)
१९६९: मुमताज जहाँ बेगम देहलवी ऊर्फ मधुबाला – चित्रपट अभिनेत्री (जन्म: १४ फेब्रुवारी १९३३  नवी दिल्ली)
१९६९: प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार वृंदावनलाल वर्मा यांचे निधन.
१९७५: ओडीसा चे माजी मुख्यमंत्री राजेंद्र नारायण सिंह देव यांचे निधन.
१९९८: रमण लांबा – क्रिकेटपटू (जन्म: २ जानेवारी १९६०)
१९९०: पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध भारतीय लेखक अमृतलाल नागर यांचे निधन.
२०००: वासुदेवशास्त्री धुंडिराज तांबे – वेदशास्त्राचे गाढे अभ्यासक
२००४: विजय आनंद – हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: २२ जानेवारी १९३४)
२००४: सिकंदर बख्त – केन्द्रीय परराष्ट्रमंत्री, केरळचे राज्यपाल व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते (जन्म: २४ ऑगस्ट १९१८)
२०११: सहज योग च्या संस्थापिका आणि अध्यात्म गुरु निर्मला श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ३० एप्रिल १९२३).

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे-मस्के

वडवणी। प्रतिनिधी

शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वडवणी तालुक्याची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक बोलण्यात आली होती, या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ कार्यक्रम माजी नगरसेवक महादेवराव जमाले पाटील यांनी आयोजित केला होता.तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलण्यात आली होती. या बैठकीला वडवणी तालुक्यातील कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. या बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते, नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हा कार्यकारणी बरखास्त केल्याने नवीन कार्यकारणी मध्ये आपल्याला स्थान मिळावे यासाठी वडवणी तालुकाध्यक्ष होण्यासाठी सहा-सात लोकांनी इच्छा व्यक्त केली आहे. या ठिकाणी बैठकीत तालुका अध्यक्ष पदासाठी आपल्याला मिळावं यासाठी लॉबिंग करताना कार्यकर्ते दिसून आले आहेत.



या बैठकीमध्ये राजेंद्र मस्के असे म्हणाले की बीड जिल्हा पुरोगामी विचाराचा जिल्हा आहे माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांना मानणारा मोठा वर्ग या जिल्ह्यामध्ये आहे. यामुळे पक्षाची सत्ता असो किंवा नसो कार्यकर्ते पवार साहेबांच्या सोबत असतात त्यामुळे तालुकाध्यक्ष होण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांना संधी मिळण्याची अपेक्षा आहे,या सर्व अपेक्षा आपण पुढच्या कार्यकाळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये पूर्ण करणार असा विश्वास जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला आहे, तसेच या बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष माजलगाव मतदारसंघाचे नेते मोहनदादा जगताप यांनी आपल्या भावना व्यक्त करत असताना असे सांगितले की माझा पराभव हा अल्पमताने झाला आहे. माझ्यापेक्षा माझा पक्ष मोठा आहे ही ताकद शरदचंद्रजी पवार साहेबांचे आहे कार्यकर्त्यांनी निष्ठेने काम केले असते तर मी नक्कीच माजलगाव मतदार संघाचा आमदार म्हणून निवडून आलेलो दिसलो असतो .परंतु कार्यकर्त्यांनी पक्षाचे पदे घेऊन ज्या पक्षाने उमेदवार दिला आहे त्याच्या विरोधात काम केल्याचे दिसून आले आहेत. यामुळे आगामी काळात ही दुटप्पी धोरण असणारे कार्यकर्ते आता आपण खड्यासारखे बाजूला करणार आहोत. मला प्रामाणिकपणे व गरीब कार्यकर्त्यांनी साथ देण्याचे काम केले आहे अशा कार्यकर्त्यांना नक्कीच विसरणार नाही असे उद्गार मोहन जगताप यांनी बैठकीत काढले.यावेळी सोमनाथराव माने, श्रीराम मुंडे, महादेवराव जमाले,सुरेश भोरे, रामेश्वर भाऊ ,प्रकाश जेधे, भास्कर उजगिरे, सुग्रीव मुंडे ,खलील पठाण, शेख अखिल भाई ,विशंभर सावंत, बापू घोलप, पठाण इम्रान, अश्विन शेळके, आत्माराम जमाले, डॉ महादेव जाधव, बाबुराव जाधव, शेख अशपाक भाई, बाबासाहेब राऊत, घाडगे सरपंच, जयदत्त खोटे, संभाजी मस्के, सुधाकर चव्हाण, पंकज धांडे, महेश सावंत, बाळासाहेब गात,राकेश बिराजदार, लालासाहेब पन्हाळे, सुरेश माने, शाम कोठुळे, सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वे लाईनसाठी तपासणीचे आदेश

### खा.बजरंग सोनवणेंनी केली होती नव्या रेल्वे मार्गासाठी केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी

केज। प्रतिनिधी

उस्मानाबाद (धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी देण्याची आणि ती जलद करण्याची मागणी दि.१० फेबुवारी रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत शिवजयंतीच्या मुहूर्तावर केंद्रीय मंत्र्यांनी संबधित रेल्वेमार्गाची तपासणी करण्याचे आदेश रेल्वे संचालकांना दिले आहेत.



खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या पत्रात म्हटले होते. उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन मार्ग प्रकल्पाचा २८ जुलै २०२२ रोजी रेल्वे बोर्डाला अहवाल सादर करण्यात आला. या प्रकल्पाची एकूण लांबी २४०.१५ किमी आहे. ज्याचा अंदाजे खर्च ४८५७.४७ कोटी रुपये आहे. मराठवाडा प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि व्यापार आणि उद्योगासाठी नवीन मार्ग उघडण्यासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा आहे. याव्यतिरिक्त, प्रस्तावित प्रकल्पाचा-२.४७ टक्केच्या परतावा दराने (आरओआर) आढावा घेण्यात आला आहे. ज्यामुळे रेल्वे नेटवर्कसाठी व्यवहार्य आणि फायदेशीर गुंतवणूक सुनिश्चित होईल. या प्रकल्पात राज्य सरकारसोबत खर्च वाटप मॉडेलचाही समावेश आहे. या प्रकल्पाचे धोरणात्मक महत्त्व लक्षात घेता, या रेल्वे मार्गाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची मंजुरी आणि काम सुरु करण्यास प्राधान्य देणे. प्रकल्प अंमलबजावणीत आणखी विलंब होऊ नये म्हणून मंजुरी प्रक्रिया जलद करणे. सुरळीत अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य संस्थांमध्ये समन्वय साधणे यासाठी बीड जिल्ह्याचे खासदार प्रयत्नशील आहेत. हा रेल्वे मार्ग एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करेल. ज्यामुळे या प्रदेशात आर्थिक समृद्धी येईल आणि येथील रहिवाशांचे जीवनमान सुधारेल, असे म्हटले होते. यानंतर ९ दिवसाने म्हणजेच शिवजयंतीच्या मुहूर्तावर दि.१९ फेब्रुवारी रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी पत्राव्दारे या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत प्रकल्पाची व्यवहार्यता व सुविधा तपासणी करण्याचे आदेश संबंधित संचालक यांना देण्यात आले आहेत.

## पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार - माजी आ. गोरंट्याल



जालना। प्रतिनिधी

राज्यभरातील पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी येथे दिले. गुरुवार (दि. २०) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्ह्याच्यावतीने दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ. गोरंट्याल बोलत होते. यावेळी पीसीएमचे राज्य सरचिटणीस महेश जोशी, संस्थापक सरचिटणीस विजयकुमार सकलेचा, जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस माजी आ. गोरंट्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आचार्य जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले.पुढे बोलतांना माजी आ. गोरंट्याल दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा पुतळा बसविण्यासाठी आपण शंभर टक्के प्रयत्न करून त्याच बरोबरच राज्यातील पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या ज्या काही मागण्या आहेत. काँग्रेसच्या वरिष्ठांशी चर्चा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही गोरंट्याल म्हणाले.

प्रास्तविक करतांना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केले. तसेच आचार्य जांभेकर यांचे पत्रकारिता क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात मोठे कार्य आहे. दर्पण आणि मासिक दिग्दर्शन या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात योगदान दिले. तर अनिष्ठ रुढी परंपरा बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांचे सामाजिक कार्यही मोठे आहे. त्यामुळे जालना महानगर पालिका हद्दीतील बस स्थानक ते छत्रपती संभाजीनगर रोड, लक्कडकोट मार्गास दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव देण्यात यावे व याच भागात त्यांचा अर्धकृती पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी माजी आ. गोरंट्याल यांच्याकडे केली. तसेच शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार दर दोन वर्षांनी महागाई निदेशांकाची सांगड घालून वृत्तपत्रांना दरवाढ देणे आवश्यक असतांना गेल्या सहा वर्षांत एकदाही दरवाढ झालेली नाही, या व इतर पत्रकार वृत्तपत्रांच्या मागण्या मांडल्या. यापुर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह सध्याचे आमदार खोतकर यांना निवेदन दिले मात्र, त्यांनी निवेदनाची कोणतीही दखल अद्यापपर्यंत घेतली नाही. आपण पत्रकार वृत्तपत्रांच्या समस्यांकडे लक्ष देऊन समस्या सोडवाव्यात अशी विनंती माजी आ. गोरंट्याल यांना केली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुहास वैद्य यांनी केले तर आभार शेख ईस्माइल यांनी मानले. दरम्यान, माजी आ. गोरंट्याल यांना पीसीएम जालनाच्यावतीने पत्रकार व वृत्तपत्रांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले.यावेळी ज्ञानेश्वर ढोबळे, शेख उमर, संदीप भाकरे,नरेंद्र जोगड , शेख नबी सिपोराकर , बद्री उपरे, संतोष भुतेकर, योगेश पिछाडे, राहुल भालके यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती.

## दरनिर्वाहासाठी लहानग्यांच्या जीवघेण्या कवायती

### डोंबारी खेळांकडे नागरिकांचे दुर्लक्ष; बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले

लिंबागणेश। प्रतिनिधी

शिक्षणाचा गंध नसलेल्या डोंबारी समाजाची कथा आणि व्यथा वेगळीच असल्याने या समाजातील लहानग्यांना दोरी वर वेगवेगळी प्रात्यक्षिके करावयास लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो.

एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करत असल्याचे दाखवत असताना वास्तव वेगळेच असुन ५ ते १० वर्षाच्या कोवळ्या जिवांना जीवघेण्या कसरती करायला लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उदरनिर्वाह करत असल्याचे भयान वास्तव ग्रामीण भागात दिसून येते. शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श न झालेला हा डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला तसेच बाजारपेठेत पारंपरिक डोंबारी कला सादर करत नाच व खेळ याच संगम साधत टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांसमोर कला सादर करून मिळालेल्या उदरनिर्वाह करीत आहेत.



पुर्वी डोंबाऱ्याचा खेळ आला की खेळ पहायला गाव जमा व्हायचे. विविध साहसी खेळ दाखवले जायचे.खेळ झाल्यावर जमलेले बघे लोक १०,२०,५० रूपये द्यायचे परंतु आता खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले आहेत. कधी २०० तर कधी नशिबाने ५०० रुपये मिळतात. या खेळातुन पुर्वी चांगली बिदागी मिळत होती व यावर कुटुंबाची उपजीविका चांगली चालत होती.परंतु आजकाल खेळ पाहण्यासाठी लोकांकडे वेळ नाही.गावच्या वेशी जवळ अथवा रोडलगत खेळ सुरू केला तर लोक नजर टाकुन पुढे निघून जातात. त्यामुळे सध्या उपजिविकेचा व्यवसाय अडचणीत आल्याची खंत नागपुरचे रामलाल यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी लिंबागणेश येथे खेळ सादर केल्यानंतर संवाद साधताना बोलावून दाखवली.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात बौद्धिक संपदेवर कार्यशाळा

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २१ फेब्रुवारी रोजी बौद्धिक संपदा, बौद्धिक संपदा हक्क व सर्वाधिकार या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व प्राणिशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. साधनव्यक्ती म्हणून प्रोफेसर महादेव काळे उपस्थित होते. प्रास्ताविक व साधनव्यक्तीचा परिचय प्रोफेसर प्रशांत पाटील यांनी करून दिला. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात प्रोफेसर महादेव काळे यांनी बौद्धिक संपदा, संपदा हक्क व सर्वाधिकारी म्हणजे काय तसेच बौद्धिक संपदेत अंतर्भूत असलेले विविध प्रकार सविस्तर स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केला.सूत्रसंचालन व तांत्रिक साह्य प्रा. अजिंक्य साखरे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रोफेसर प्रशांत पाटील यांनी केले.

## बहुजनांच्या सोबतीने शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली.डॉ.योगेश क्षीरसागर

बीड

तीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवरायांनी कोणत्याही जाती धर्माचा द्वेष न करता, सर्वांना समान सामाजिक न्यायाच्या हेतूने,वंचित, अपेक्षित समूहांना सोबत घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ उभारली.असे प्रतिपादन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

पुढे बोलताना डॉ.क्षीरसागर म्हणाले की,अठरा पगड जातींच्या मावळ्यांना सोबत घेत छत्रपती शिवरायांनी या स्वराज्याचे तोरण बांधून रयतेच्या मनात सुशासनाचा आदर्श निर्माण केला.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लेझीम संचलन करून छत्रपती शिवरायांची भव्य मिरवणूक काढली, पोवाडा, नाट्य, पाळणा, यांसह विविध दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी संसदेच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल,उपप्रचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर,उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर यांनी केले. सूत्रसंचालन समन्वयक डॉ.पूनम शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन रमेश थोरात यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.शेख अतीक, डॉ.शेख जफर,डॉ मीना हंगे,डॉ.सुनील जायभाये डॉ.अजय कुलकर्णी, डॉ.राजेश कुलकर्णी डॉ.वैभव शाहापुरे,डॉ.नवाज शेख,एकनाथ टेपाळे,नायब खान,अमन खान,रमेश थोरात,यांचे सह कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यांग निधीतही पालिकेकडून गैरकारभार-सुरेश माने

बीड। प्रतिनिधी

पालिकेकडून शहरातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांपोटी वसूल केलेल्या करातून आणि पालिकेच्या एकूण उत्पन्नातील ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींसाठी खर्च केला जातो मात्र बीड पालिकेने तो दिव्यांगांना दिला नाही. या संदर्भात माहितीच्या अधिकारात माहिती मागूनही दिली नाही. ३ फेब्रुवारी पर्यंत माहिती दिली नाही तर सर्व दिव्यांगांना घेऊन बीड पालिकेसमोर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवे गट) सुरेश माने यांनी दिला आहे.

बीड पालिकेने दिव्यांगाना पालिकेच्या उत्पन्नापैकी दिला जाणारा पाच टक्के निधी दिला नसल्याने सुरेश माने यांनी २७ जानेवारी रोजी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवली होती. मात्र त्यांना पालिकेने अद्याप माहिती दिली नसल्याने त्यांनी बीड पालिकेला स्मरण पत्र दिले असून ३ फेब्रुवारी पर्यंत सन २०१६ ते २०२३ दरम्यान दिव्यांग व्यक्तीसाठी ५ टक्के प्रतिवर्षाकरीता किती निधी आला. एकुण बीड नगर पालिकेचे वर्षाकाठी किती उत्पन्न आहे. दिव्यांगांसाठी यापैकी किती निधी खर्च झाला. ही माहिती ३ फेब्रुवारी पर्यंत द्यावी अन्यथा दिव्यांगाना घेऊन पालिके समोर उपोषण करण्याचा इशारा सुरेश माने यांनी दिला आहे.

## उद्याच्या सामर्थ्यवान भारतासाठी युवकांनो शिवविचार आत्मसात करा-प्रा.तुपे

### तुलसी महाविद्यालयात शिवजयंती जन्मोत्सव भव्य दिव्य पद्धतीने साजरा

बीड। प्रतिनिधी

शिवजयंती हा केवळ उत्सव नाही, तर तो एक संकल्प आहे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा आणि त्यांच्या संघर्षाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. त्यांच्या विचारांना आपल्या आयुष्यात उतरवून त्यांच्या पराक्रमाची आणि नेतृत्वाची प्रेरणा घेऊन उद्याच्या सामर्थ्यवान भारतासाठी युवकांनी शिवविचार आत्मसात करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवचरित्रकार, प्रसिद्ध व्याख्याते प्रा.कैलास तुपे यांनी व्यक्त केले. बीड येथील तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने बुधवार दि. १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३२५ व्या जयंतीनिमित्त तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित विशेष व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बीड येथील देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे तर विचार मंचावर तुलसी आयटी कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे, तुलसी फॅशन कॉलेजचे प्राचार्य डॉ.अशोक दुलदुले, तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य मिलिंद वडमारे, तुलसी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रकाश ढोकणे, तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या उमा जगतकर आदि उपस्थित होते.



पुढे बोलतांना प्रा.कैलास तुपे म्हणाले की,आयुष्य फार छोट आहे रांगोळी किती ठिपक्यांची आहे हे जरी विधात्यांच्या हातात असले तरी रांगोळीत कोणते रंग भरायचे हे आपल्या हातात आहे. युवा शब्द उलटा केला तर वायू आणि वायू म्हणजे वारा, वेग, पवन ज्याला कोणी थांबवू शकत नाही ती युवा शक्ती आमच्यामध्ये असतांना मी जिथे वागतो ती जागा पवित्र व्हावी, मी तिथे राहतो तो जिल्हा सामर्थ्यवान असावा आणि तो जिल्हा ज्या राज्याचा आणि देशाचा घटक असावा ते सामर्थ्यवान राष्ट्र उभारावे तीच प्रेरणा महाराजांच्या विचारातून घेऊन शिवजयंती साजरी करणे हाच खरा त्यांना केलेला सन्मान आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी सांगितले. त्यांनी शिवाजी महाराजांच्या राष्ट्रनिष्ठा, धैर्य, नेतृत्वगुण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचा आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, काळ बदलतो आणि आपणही त्या बदलांना अनुसरून बदलले पाहिजे. यशस्वी आयुष्य जगण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती, सतत शिक्षण आणि जागरूकता आवश्यक आहे. बातम्या ऐकणे, वर्तमानपत्रे वाचणे आणि महापुरुषांची चरित्रे अभ्यासणे यामुळे आपल्याला जगातील घडामोडींची माहिती मिळते, नवीन कल्पना आणि प्रेरणा मिळते आणि आपल्या विचारसरणीत सकारात्मक बदल घडवून आणता येतो असे मत व्यक्त केले याप्रसंगी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या रांगोळी,वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. वर्षा काळे या मुलीने स्वतः बनवलेली शिवाजी महाराजांची फ्रेम विद्यालयाला सप्रेम भेट दिली. महाविद्यालयाचा बीसीए अभ्यासक्रमाचा विद्यार्थी आदित्य ठोंबरे याने प्रभावी सूत्रसंचालन केले तर डॉ. योगिता लांडगे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले. यानंतर रक्तदान शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी तुलसी समूहातील सर्व कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठान येथे अंजलीताई केंद्रे महाराज यांचे कीर्तन

बीड। प्रतिनिधी

श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान, बीड येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्ष दि. २० फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान २९ वा सर्वधर्म समभाव राष्ट्रीय एकात्मता अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी ह भ प प्राचार्य परशुराम मराडे सर यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ८.३० दरम्यान स्वररत्न भागवताचार्य तथा रामायणाचार्य ह भ प अंजलीताई केंद्रे महाराज उदगीरकर यांचे अमृततुल्य किर्तन होणार आहे .तरी बीड शहरातील भाविक भक्तांनी कीर्तनसेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष तथा सप्ताह समितीचे सदस्य डॉ संजय तांदळे यांनी केले आहे.

तसेच सोमवार दि. २४ रोजी ह भ प डॉ. भागवत मोटे व ह भ प उषाताई मुंडे महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ह भ प पांडुरंग महाराज जाधव गुरुजी , सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, बीड यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवार दि. २५ रोजी ह भ प श्रीमंत महाराज तांदळे व ह भ प बद्रीनाथ महाराज नाथजोगी यांचे प्रवचन तर ह भ प नवनाथ महाराज शास्त्री ,मठाधिपती, श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ संस्थान, भालगाव यांचे कीर्तन होणार आहे. बुधवार दि. २६ रोजी ह भ प महामंडलेश्वर स्वामी शिवरुद्रनंद, महाराज काशी व श्रीसंत भगवान बाबा प्रतिष्ठान, बीड यांचे प्रवचन सायंकाळी ६.३० ते ८.३० महामंडळेश्वर स्वामी १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज मठाधिपती, इंदुवासीनी संस्थान , गणेशानंद गड, पिंपळनेर, यांचे कीर्तन होणार आहे .

गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ११ ते १ दरम्यान कुटचिंतन प्रवक्ते ह भ प महादेव महाराज राऊत ( म्हाळसजवळेकर )यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. कीर्तनानंतर निमंत्रित मान्यवरांचा सत्कार आणि त्यानंतर महाप्रसादाने कीर्तनाची सांगता होणार आहे.

सप्ताहातील किर्तन ,प्रवचन व सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# रस्त्याचा श्वास मोकळा झाला...!

## पण छोट्या व्यावसायिकांचे लाखोंचे नुकसान, अनेक जण आले रस्त्यावर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने मुख्य रस्त्यावरून तसेच अंतर्गत रस्त्यावरही अतिक्रमण हटाव मोहीम चालू आहे. या मोहिमेमुळे जालना रोड, सुभाष रोड, कारंजा रोड ,डीपी रोड आदि रस्त्यांचा श्वास मोकळा झाला. वाहतुकीला जो अडथळा निर्माण होत होता तो काही प्रमाणात का होईना कमी झाला. मात्र यामुळे गोरगरीब व्यावसायिकांचे लाखोंचे नुकसान झाले. या मोहिमेतून अनेक जण रस्त्यावर आले. वाहतुकीचा अडथळा दूर झाला असला तरी अनेकांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बीड शहरामध्ये गेल्या तीन चार दिवसापासून मुख्य रस्त्यावरील तसेच अंतर्गत रस्त्यावरील अतिक्रमण हटाव मोहीम चालू आहे. बीड शहरातील जालना रोड, शाहूनगर भाग ,सुभाष रोड , सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स आदी भागामध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली. यामध्ये सुभाष रोडवर असलेल्या छोट्या व्यावसायिकांच्या पायऱ्या आणि शेड तोडण्यात आले. केवळ सात बाय पाच एवढ्या भागांमध्ये नगरपालिकेने ही दुकाने भाडेतत्वावर दिली आहेत. मात्र यामुळे त्यांना रस्ता कुठून हा प्रश्न निर्माण झाला आहे.नालीच्या आत मध्येच आपला कारभार करायचा असा सूचना दिल्याने त्या दुकानात नेमके जायचे कसे? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मध्ये अनेक छोटे व्यावसायिक व्यवसाय करत होते. त्यांचा हे समोरचा भाग पाडून टाकण्यात आला. वास्तवीक पाहता हा परिसर मुख्य रहदारीचा नसला तरी या ठिकाणी संध्याकाळच्या वेळी मोठी गर्दी असते. चहाचे हॉटेल गजबजून गेलेले असतात.बीड शहरात विरंगुळा म्हणून कुठेच मोकळी जागा नसल्याने शहरातील जवळपास सर्वच लोक संध्याकाळच्या वेळी या ठिकाणी येतात. त्यामुळे या ठिकाणी चहाचे हॉटेल जोरात चालतात.






### सिद्धिविनायकचा पथरस्ताही कायम मोकळा असावा

सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरामध्ये गाळेधारकांसाठी समोर पोर्च देण्यात आला आहे .याचा उपयोग ग्राहकांना फिरण्यासाठी व्हायला हवा मात्र अनेक व्यापाऱ्यांकडून ही आपल्या हक्काची जागा असल्यासारखे सर्व सामान बाहेर आणून ठेवले जाते. अनेकांनी ओटे बांधून ठेवले आहेत. हा मार्ग कायमस्वरूपी मोकळा असावा आणि त्यासाठी ही मुख्याधिकाऱ्यांनी तंबी द्यावी अशी अपेक्षा या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

मात्र त्यांचे शेड काढल्यामुळे या छोट्या व्यवसायिकांचे काही प्रमाणात का होईना नुकसान झालेले आहे. प्रत्येक छोट्या व्यवसायिकांच्या नुकसानीचा विचार केला तर हा आकडा लाखोंच्या घरात जातो. समोर मारलेले शेड, समोर असलेल्या खुर्च्या, काही टपऱ्याही या ठिकाणाहून हलवण्यात आल्या. ज्यावेळी हे लोक व्यवसाय सुरू करतात त्याचवेळी त्यांना नगरपालिकेच्या वतीने मज्जाव करायला हवा होता. मात्र तसे होत नाही वरून आदेश आल्यानंतरच नगरपालिकेला जाग येते. आणि मग अतिक्रमण हटाव मोहीम सुरू होते. ही मोहीम किमान महिना - दोन महिन्याला झाली तर असे व्यावसायिक आपला पसारा वाढवणार नाहीत. मात्र कधीतरी वर्षा -दोन वर्षाला ही मोहीम राबवली जाते. त्यामुळे पुन्हा हे अतिक्रमण बसते आणि पुन्हा व्यवसाय सुरू होतात .नगरपालिकेने जर वेळीच लक्ष दिले तर हे व्यवसाय सुरू होणार नाहीत. आणि सर्वसामान्य माणसाचा खर्च होणार नाही. नगरपालिका लक्ष देत नाही म्हणून हे व्यवसायिक कुठेही दुकाने थाटतात. वेळेत लक्ष दिले तर हा प्रकार होणार नाही .मात्र संबंधित अधिकारी आणि कर्मचारी याकडे हेतू पुरस्सर दुर्लक्ष करतात आणि मग असे काही आदेश आले की मग तोडफोड सुरू होते .नागरिकांच्या रहदारीचे रस्ते मोकळे असायलाच हवेत .त्यात दुमत नाही. मात्र हे अतिक्रमण बसण्यापूर्वीच त्यांना तंबी दिली तर ते बसणार नाहीत. अशी नगरपालिकेकडून व्यवस्था होणे गरजेचे आहे .सध्या भाजी मंडई भागात आणि सुभाष रोडवर रस्त्यांचा श्वास मोकळा झाला आहे. मात्र हा श्वास कायम मोकळा रहावा यासाठी नगरपालिका काय प्रयत्न करते हे काळच ठरवेल. सध्या नगरपालिकेचा कारभार एकसुत्री चालू आहे .नगरपालिकेच्या मुख्याधिकारी श्रीमती अंधारे या मुख्याधिकारी आहेत. त्यांच्यावर अंकुश ठेवणारी लोकप्रतिनिधी नावाची यंत्रणा सध्या अस्तित्वात नसल्याने मनमानी कारभार चालू आहे. जसे अतिक्रमण हटवले तसेच कचऱ्याचे ढिग वेळेत उचलले पाहिजेत. लोकांना पिण्याचे पाणी वेळेवर मिळाले पाहिजे. रस्त्यावरचे पथदिवे वेळोवेळी दुरुस्त झाले पाहिजेत. शहरांमध्ये अनेक ठिकाणी मुताऱ्यांची व्यवस्था नाही. त्याकडे लक्ष दिले जात नाही. सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मध्ये अर्धवट मुतारी बांधून ठेवली आहे. मात्र ती पूर्ण बांधायला नगरपालिकेकडे लाख- पन्नास हजार नाहीत .अशी नगरपालिकेची अवस्था आहे. ज्या कामासाठी खर्च करणे गरजेचे आहे. त्याकडे दुर्लक्ष केले जाते .मात्र काही हितसंबंध जपण्यासाठी जो अवाजवी खर्च करावा लागतो तो केला जातो .अशी सध्या नगरपालिकेची परिस्थिती आहे. नगरपालिकेचे काहीही असो मात्र सध्या तरी छोटे व्यावसायिक नुकसान झाल्याने अडचणीत आल्याचे दिसत आहे.

## रानडूकराच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

### माजलगाव तालुक्यातील शहाजानपूर येथील घटना

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघातील तिन्ही तालुक्यांमध्ये रानडुकराचे मोठ्या प्रमाणात प्रस्थ निर्माण झाले आहे रानडुकरामुळे शेतातील पिकाचे अतोनात नुकसान होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी रात्री- अपरात्री शेतात जावे लागते त्याप्रमाणे किसनराव डोईजड हे आपल्या शेतात गेले असता रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केल्याने यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत.



माजलगाव तालुक्यातील शहाजानपूर गावासह परिसरात रानडुकरांनी थैमान घातले आहे.रब्बी हंगामातील गहू, ऊस,ज्वारी,हरभरा आधी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान रानडुक्कर करत आहेत म्हणून शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाऊन रात्री-आप रात्री गस्त घालावी लागत आहे.अशीच गस्त घालण्यासाठी गेलेले परमेश्वर किसनराव डोईजड हे शेतात रानडुकरा पासून आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी गस्त घालत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत त्यांच्यावर माजलगाव येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत रानडुकरांचे वाढते थैमान कुठेतरी आवरायला हवे अशी मागणी शहाजानपुर गावकऱ्यासह परिसरातील नागरिकाकडून वन विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

## पाटोदा पशुवैद्यकीय कार्यालय वाऱ्यावर

### अधिकारी, कर्मचारी सतत गैरहजर,सि.ई.ओ.नी लक्ष द्यावे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे पशुवैद्यकीय कार्यालयात सावळा गोंधळ चालू असून हे कार्यालय दि.२१ शुक्रवार रोजी अकरा वाजून पंचवीस मिनिटांपर्यंत उघडले नव्हते अधिकाऱ्यांनी व कर्मचारी यांनी वाऱ्यावर कार्यालय सोडले असून याकडे मात्र कोणीही लक्ष देत नसून वारंवार या कार्यालयात सतत कर्मचारी गैरहजर असून कधी येतात कधी येत नाहीत दिवस दिवस कार्यालय बंद असते तरी तात्काळ जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांनी लक्ष देऊन तात्काळ संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की शेतकऱ्याच्या निगडित असणारी पशुवैद्यकीय तालुका कार्यालय पाटोदा येथील अधिकारी व कर्मचारी हे सतत गैरहजर असतात वारंवार शेतकऱ्यांच्या तक्रारी असूनही याकडे मात्र तालुका पशुवैद्यकीय अधिकारी हे दुर्लक्ष करत असून यांचे कार्यालय कधी चालू तर कधी बंद अशी अवस्था चालू असून दि.२१ रोजी शुक्रवार अकरा वाजून पंचवीस मिनिटापर्यंत या ठिकाणी कार्यालय बंद होते याकडे मात्र कोणीही लक्ष देत नसून यामुळे शेतकऱ्यांच्या अडचण निर्माण होत आहे तरी याकडे तात्काळ लक्ष देऊन जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांनी लक्ष देऊन संबंधितावर दि.२१ रोजी कार्यालय बंद ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती वानखेडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ कार्यालय वेळेवर न उघडल्याने नोटीस पाठवतो असे दुरध्वनी द्वारे म्हटले आहे.

## शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलमध्ये अखंड हिंदुस्थानचे दैवत रयतेचे राजे छत्रपति शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्तने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून ग्रा.प.सदस्य चंद्रकांत भुसारी,ज्योतिराम सावंत तर गणेश रोडगे,मयुर खंडेलवाल,पत्रकार सचिन उजगरे,विकास जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व दिपप्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे व द्वितीय क्रमांकाचे विजेते यांच्या तडफदार भाषणाने झाली.तर गोपाळ विश्वास शिनगारे,विराज विनोद चौधरी,वेद सुशीलकुमार झाडबुके,आरोही धनंजय बावकर,अर्जून आविष्कार शिनगारे, संस्कार क्षितीज जाधव, श्लोक श्रीराम शिनगारे,ईश्वरी सुरज मुकदम, प्रथमेश योगेश लामतुरे, हिंदवी इष्टलिंग थळकरी,आरूष ज्ञानेश्वर ◀◀ पान ३ वर

## श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठान येथे अंजलीताई केंद्रे महाराज यांचे किर्तन

**बीड । प्रतिनिधी**

श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान, बीड येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्ष दि. २० फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान २९ वा सर्वधर्म समभाव राष्ट्रीय एकात्मता अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी ह भ प प्राचार्य परशुराम मराडे सर यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ८.३० दरम्यान स्वररत्न भागवताचार्य तथा रामायणाचार्य ह भ प अंजलीताई केंद्रे महाराज उदगीरकर यांचे अमृततुल्य किर्तन होणार आहे .तरी बीड शहरातील भाविक भक्तांनी कीर्तनसेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मातृभुमी प्रतिष्ठान



बीड चे अध्यक्ष तथा सप्ताह समितीचे सदस्य डॉ संजय तांदळे यांनी केले आहे. तसेच सोमवार दि. २४ रोजी ह भ प डॉ. भागवत मोटे व ह भ प उषाताई मुंडे महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ह भ प पांडुरंग महाराज जाधव गुरुजी , सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, बीड यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवार ◀◀ पान ३ वर

## वैद्यनाथ संघ विजेता तर सनरायजर्स संघ उपविजेता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत वैद्यनाथ संघास विजेतेपद तर सनरायझर्स संघास उपविजेतेपद मिळाले.

### डॉ.राजेश इंगोले ठरले द मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेअर तर डॉ.प्रदीप सोनवणे मालिकावीर पुरस्काराने सन्मानित




दोन्ही तुल्यबळ संघात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात वैद्यनाथ संघाने अखेर बाजी मारली. साखळी सामन्यांमध्ये सलग चार विजयांचा धडाका लावत सनरायझर्स संघाने अंतिम फेरीत दिमाखदार प्रवेश केला होता. त्यांचा विजयाचा वारू अंतिम फेरीमध्ये मात्र वैद्यनाथ इलेव्हन संघाने आडवत त्यांना मात दिली. अंतिम सामन्यामध्ये वैद्यनाथ इलेव्हन संघाने सनरायझर्स संघाला दहा षटकांत विजयासाठी एकशे सोळा धावांचे लक्ष दिले. परंतु, सनरायझर्स संघाला केवळ शंभर धावा करता आल्या. कर्णधार प्रदीप सोनवणे यांच्या ३२ चेंडूतील तडाखेबंद ७० धावांमुळे वैद्यनाथ संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारण्यात यश आले डॉ.प्रदीप सोनवणे यांना स्पर्धेतील मालिकावीर आणि अंतिम सामन्यातील ◀◀ पान ३ वर

## माजलगाव मठात २८ एप्रिल रोजी सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

### ''सद्‌गुरुश्री मिस्कीन स्वामी संजीवनी उत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम; मठाधिपती श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची माहिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

वीरशैव लिंगायत समाजाचे धार्मिक अधिष्ठान असलेल्या सद्गुरु श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवनी उत्सव सोहळयातील विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान,सोमवार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी वीरशैव लिंगायत समाजातील तरूण-तरूणींच्या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती मठाधिपती श्रीगुरु चंद्रशेखरचार्य महाराज माजलगावकर यांनी दिली.



सिद्धयोगी शिवैक्य श्रीगुरु तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांच्या प्रेरणेने वीरशैव लिंगायत समाजातील तरूण-तरूणींचा सामुहिक विवाह सोहळा होणार आहे.तरी वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील विवाहित इच्छुकांनी सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान यांच्या मठ माजलगाव नोंदणी येथे करावी शिवहारआप्पा मो. ८२७५८५२८९८, राजाभआप्पा लोखंडे मो. ९०४९९४८१६१ मुक्त चैत्र अमावस्येला विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.त्यात, रविवार दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवनी सोहळा, लघुरुद्राभिषेक, आरती व श्रीगुरूंचे आशिर्वचन होणार असून सोमवार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी वीरशैव लिंगायत समाजातील तरूण-तरूणींच्या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठा भाग आली.

तपोरत्नं वैदिक पाठशाळेचे भाग २१ दिवस वर्ग

अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्त बुधवार, दिनांक ३० एप्रिल २०२५ पासून ते मंगळवार,दिनांक

## प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्य शासनाकडून मिळालेला पैसा घरासाठीच खर्च करावा -जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

घर म्हणजे आपल्या हक्काच असावे अशी प्रत्येक नागरिकाची इच्छा असते पण आपल्या कुवतीप्रमाणे प्रत्येकांचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. स्वत:च्या घरात रमण्याचा आनंदच काही वेगळा असतो, कुंटूंबातील वाढत्या जबाबदा-या, मुला मुलींचे शिक्षण, लग्न इतर खर्चाने माणूस कोलमडून जातो अन्? घर असावे घरासारखे हे स्वप्न सत्यात न उतरता नुसते स्वप्नच राहते, हक्काचा निवारा, घरकुल मिळवून देण्याचे काम



प्रधानमंत्री अवास योजनेमूळे लाभार्थीचे स्वप्न साकार झाले असून प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्य शासनाकडून मिळालेला पैसा घरातील गृहीणीने घरासाठीच खर्च करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेच्या ४० लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीचे निधी वितरित प्रमाणपत्रा प्रसंगी काढले.

जिल्हाधिकारी श्री. पाठक म्हणाले की, शासनाचा निधी ज्या गतीने मिळतो त्याच गतीने आपण स्वत: लक्ष घालून घरकुल पूर्ण करावे, आपल्या घराची वीट आपण स्वत:च रचावी, महिलांनी या पैशाचा उपयोग इतर खर्चासाठी न करता आपल्या जवळची जमा पुंजी घरासाठी वापरुन यंदाची दिवाळी आपण आपल्या हक्काच्या घरात साजरी करावी. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कुपोषणामुळे मुलांची वाढ खुंटण्याची समस्या गंभीर, राज्यांनी ठोस पावले उचलण्याची गरज -अमित शहा

पुणे – 'देशातील पश्चिम क्षेत्रातील राज्ये समृद्ध जरुर आहेत, मात्र या राज्यांमध्ये नागरीक व मुले कुपोषणाचे बळी ठरत आहेत, हे वास्तव आहे. कुपोषणामुळे मुलांच्या वयाच्या तुलनेत त्यांची वाढ होत नाही, ही चिंतेची व गंभीर बाब आहे. रुग्णालये व औषधोपचाराबरोबरच भविष्यात त्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने राज्य सरकारांनी ठोस पावले उचण्याची आता गरज आहे.' अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शहा यांनी कुपोषणाच्या मुद्यावर पश्चिम विभागीय आंतरराज्य परिषदेत भर दिला. तसेच विद्यार्थ्यांचे शाळांधील गळतीचे प्रमाण कमी करून शैक्षणिक गुणवत्ता वाढीला बळ देण्याचे आवाहनही त्यांनी केले..




केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या आंतरराज्य परिषद सचिवालच्यावतीने व महाराष्ट्र राज्य सरकारच्या सहकार्यातुन २७ वी पश्चिम विभागीय आंतरराज्य परिषदेचे शनिवारी (ता.२२) पुण्यात आयोजित करण्यात आली होती.

यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह केंद्रशासीत प्रदेशांचे प्रशासक, विविध राज्यांचे मुख्य सचिव, सल्लागार, केंद्रीय गृह सचिव, आंतरराज्य परिषदेचे सचिव आदी उपस्थित होते. या बैठकीत लैंगिक शोषण, महिला आणि मुलांवरील बलात्काराच्या प्रकरणांचा जलद तपास, जलदगती विशेष न्यायालयांची (एफटीएससी) स्थापन करणे, प्रत्येक गावात पाच किलोमीटर अंतरावर बँका, इंडिया पोस्ट पेमेंट बँक शाखांची सुविधा देणे आदी पर्यावरण आणि वने, अन्न सुरक्षा मापदंड अशा १८ मुद्यांवर चर्चा झाली.

शहा म्हणाले, 'संविधानाने देशातील नागरीकांना दिलेले अधिकार त्यांच्यापर्यंत पुर्ण क्षमतेने पोहोचविण्याची आता वेळ आली आहे. आगामी काळात डिजीटल पायाभूत विकास व सायबर गुन्हेगारी यांसारख्या विषयांना आंतरराज्य परिषदांच्या क्षेत्रात समाविष्ट केले जाईल. हे आव्हान पेलण्याची तयारी प्रत्येक राज्यांनी ठेवली पाहीजे.

देश व राज्याच्या दिर्घकालीन आर्थिक विकासासाठी सध्या सुरु असलेले प्रयत्न व भविष्यासाठीचा रोडमॅप घेऊनच पुढे जावे लागेल. विभागीय परिषदांच्या माध्यमातुन रणनिती व्यासपीठाच्या माध्यमातुन क्षमता वाढीचे उद्दीष्ठ ठेवण्याची गरज आहे.' विभागीय बैठकांबाबत शहा म्हणाले, 'पश्चिम विभागीय क्षेत्र देशासाठी महत्वपूर्ण आहे. त्याद्वारे देशाचा अर्ध्याहून अधिक व्यापार याच क्षेत्रातून होतो. उत्तर व मध्य क्षेत्र देखील जगासमवेत व्यापार करण्यासाठी पश्चिम क्षेत्रावर अवलंबुन आहे. या क्षेत्रातील बंदरे, पायाभूत सुविधा व शहरांमधील विकास हा केवळ पश्चिम क्षेत्रातील व्यापारासाठीच नव्हे, तर काश्मिर, मध्य प्रदेश व राजस्थानसारख्या राज्यांनाही त्याचा उपयोग होतो आहे. पश्चिम क्षेत्र संपूर्ण देशातील संतुलीत व समग्र विकासाचा मानदंड ठरलेला आहे. नरेंद्र मोदी यांनी विभागीय परिषदांचे सरकारी औपचारीक स्वरुप बदलून त्याचे परिवर्तन करणाऱ्या संस्थांमध्ये रुपांतर केले.२०१४ ते २०२५ या कालावधीत तब्बल ६१ बैठका झाल्या.

यापूर्वीच्या दहा वर्षांच्या बैठकांच्या तुलने १४० टक्के जास्त आहेत. २०१४ ते २०२५ पर्यंतच्या बैठकांमध्ये तब्बल १५४१ इतक्या मुद्यांवर चर्चा झाली आहे. त्यापैकी १२८० प्रश्न सोडविण्यात आले.' विभागीय परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शहा यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे कौतुक केले.

# हॅकेथॉनमुळे देशात नवउद्योजक घडणार : डॉ. नितीन करमळकर

पुणे । प्रतिनिधी

हॅकेथॉनमुळे विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना वाव मिळत असून यातून उद्योजक घडण्याची प्रक्रिया सुरू होते. या संकल्पनांचा उपयोग हा सामाजिक समस्या सोडविण्यासोबतच, औद्योगिक आस्थापनांना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी होणार आहे. या प्रकल्पातून उद्याचे स्टार्टअप विकसित होणार आहे. त्यामुळे अशा हॅकेथॉन स्पर्धांना समाजाने पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे, असे मत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर यांनी शनिवारी व्यक्त केले.



विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण संकल्पनांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यातील उद्यमशीलतेला पाठबळ देण्याच्या उद्देशाने 'इनोव्हेशन फाऊंडेशन'च्या वतीने 'इनोव्हेट यु टेकॅथॉन २.०' या राष्ट्रीय स्तरावरील हॅकेथॉनच्या दुसऱ्या पर्वाचा शुभारंभ झाला. याप्रसंगी डॉ. करमळकर बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे, एआयएसएसएमएस आयओआयटीचे प्राचार्य डॉ. प्रदीप माने, इनोव्हेशन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कल्पेश यादव आदी उपस्थित होते. यावेळी इनोव्हेशन फाउंडेशनचे पदाधिकारी तेजस यादव, प्रणव आडकर, नरेंद्र गडदे, निकुंज वाव्हळ, प्रसन्न चव्हाण, राजेंद्र पुरोहित, हर्षद पोरे, सोहित बनकर हे उपस्थित होते. कल्पेश यादव म्हणाले, या स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सोडवून, त्याचे सोल्युशन समाजासमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या हॅकेथॉनच्या नोंदणीला देशभरातील अभियांत्रिकी महविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, आयआयटी, ट्रीपलआयटी यांच्यासह ३२३ संघ स्पर्धेत उतरले आहेत.

# मिरवणुकीत संगणक अभियंत्याला मारहाण करणार्या तिघांना अटक

पुणे । प्रतिनिधी

मिरवणुकीतून दुचाकी काढण्याचा प्रयत्न करणार्या संगणक अभियंत्याला मारहाण करणार्या तिघांना कोथरूड पोलिसांनी अटक केली. ओम तीर्थराम धर्मजिज्ञासू (वय ३५, शिंदे चाळ, शास्त्रीनगर, कोथरूड), किरण कोंडीबा पडवळ (वय ३१, शेख चाळ, शास्त्रीनगर) आणि अमोल विनायक तापकीर (वय ३५, रा. लालबहाद्दूर शास्त्री कॉलनी शास्त्रीनगर) अशी तिघांची नावे आहेत. न्यायालयाने त्यांना २४ फेब्-ुवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.




घटनेत, देवेंद्र पुरुषोत्तम जोग (वय ३३, रा. कोथरूड) हे जखमी झाले असून, त्यांनी दिलेल्या फिर्यादिवरून कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोथरूड भागातील भेलकेनगर परिसरातून बुधवारी दुपारी साडेचारच्या सुमारास एका मंडळाकडून श्री शिवजयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली. संगणक अभियंता जोग यांना सुटी असल्याने ते दुपारी साडेचारच्या सुमारास दुचाकीवरून खरेदीसाठी बाहेर पडले. खरेदी करून घरी जात असताना समोरुन मिरवणूक येत होती. दुचाकीवरून वाट काढणार्या जोग यांना तिघांनी अडविले. दुचाकी नीट चालविता येत नाही का? अशी विचारणा करून तिघांनी जोग यांना बेदम मारहाण केली. नाकावर ठोसा बसल्याने त्यांना दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती वडिलांना दिली. जखमी अवस्थेतील जोग यांनी कोथरूड पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दिली.

या प्रकरणी तिघांना अटक करून न्यायालयात हजार करण्यात आले. आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. त्यांची जनमानसात व समाजामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे दहशत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध साक्षीदार होण्यास अगर तक्रार देण्यास नागरिक समोर येत नसल्याने गुन्ह्याचा तपास करण्यासाठी आरोपींना पोलीस कोठडी देण्याची मागणी तपास अधिकारी यांनी न्यायालयात केली. बचावपक्षाच्या वतीने ॲड. विजयसिंह ठोंबरे यांनी काम पाहिले. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# कर्तव्य बजावताना सहायक पोलिस फौजदाराचा मृत्यू; व्हीआयपी बंदोबस्ताचा बळी गेल्याची चर्चा

पिंपरी : पिंपरी-पोलिस दलातील सहायक पोलिस फौजदार किसन नामदेव वडेकर (५५) यांचा कर्तव्य बजावत असताना मृत्यू झाला. बालेवाडी येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नियोजित दौर्याच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. २१) सकाळी नियोजनासाठी आयोजित ब्रिफिंगदरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. व्हीआयपी बंदोबस्ताच्या ताणामुळे एका सहकार्याचा जीव गेल्याची चर्चा पोलिस वर्तुळात सुरू होती.



सहायक पोलिस फौजदार किसन वडेकर, हे तळवडे वाहतूक विभागात पोलिस निरीक्षकांचे रीडर म्हणून कार्यरत होते. त्यांनी यापूर्वी चिखली आणि निगडी पोलिस ठाण्यातही जबाबदारी सांभाळली होती. शांत, संयमी आणि मनमिळावू स्वभावामुळे ते संपूर्ण पोलिस दलात परिचित होते. दरम्यान, बंदोबस्त ब्रिफिंग सुरू असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. सहकार्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. या घटनेमुळे पोलिस दलात हळहळ व्यक्त होत आहे. पिंपरी-चिंचवडसह पुणे शहरात वारंवार राजकीय आणि प्रशासकीय व्हीआयपी दौरे होतात. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, इतर राजकीय नेते, वरिष्ठ सरकारी अधिकारी यांच्या भेटीवेळी पोलिसांना मोठ्या प्रमाणात बंदोबस्ताची जबाबदारी पार पाडावी लागते. अशा प्रसंगी बरेच मनुष्यबळ तैनात केले जाते आणि अनेक पोलिसांना त्यांच्या नियमित कर्तव्यां ऐवजी बंदोबस्तावर भर द्यावा लागतो.

**१२ तासांपेक्षा जास्त काम**

व्हीआयपी बंदोबस्तात पोलिसांना अनेकदा १२-१४ तास ड्युटीवर उभे राहावे लागते. या काळात त्यांना पुरेशी विश्रांती मिळत नाही. थकवा, झोपेची कमतरता, अनियमित आहार यामुळे पोलिसांचे आरोग्य धोक्यात येते. यातून हृदयविकाराचा धक्का बसून मृत्यू होण्याच्या घटना घडत असल्याचे जाणकार सांगतात.

# भांगरवाडी पुलाचे काम मुदतीत सुरू करा' – आ. सुनील शेळके

लोणावळा : नगर परिषद हद्दीतील विकास कामे आणि प्रलंबित कामाचा आढावा घेण्यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत गुरूवारी विशेष बैठक आयोजित केली होती. या बैठकीत शहरातील प्रलंबित कामांवरून आमदार शेळके यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींसह राष्ट्रवादी काँग्रेस, आर.पी.आय., भाजपा, मनसे या पक्षांसह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.



'लोणावळा शहरातील प्रलंबित कामांबाबत जिल्हाधिकारी साहेबांकडे बैठक लावण्यात आली होती. सदर बैठकीत सूचना करून देखील नगरपरिषद प्रशासन दिरंगाई करीत आहे. भांगरवाडी रेल्वे उड्डाण पुलाचे काम १० मार्च पर्यंत सुरु करावे. दिलेल्या मुदतीत हे काम सुरू झाले नाही, तर लोणावळा नगरपरिषदेला टाळे ठोकणार' असा इशारा आमदार शेळके यांनी यावेळी दिला. बैठकीत इतर अनेक विषयांवर चर्चा करीत कामांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली.

खंडाळा येथील नगरपरिषद शाळेच्या विस्तारीकरणासाठी लगतच्या जागा मालकांना तत्काळ उर्वरित पैसे देऊन जागा ताब्यात घ्यावी. यामध्ये कोणतेही राजकारण अथवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असेही आमदार शेळकेंनी सांगितले. यावेळी लोणावळा शहराचा पर्यटनदृष्ट्या विकास साधण्यासाठी वलवण तलावाच्या विकास आराखड्याची पाहणी करण्यात आली. त्यासाठी सुमारे ८ कोटी रुपये अंदाजित खर्च येणार असून ५० टक्के खर्च नगरपरिषदेने करावा व ५० टक्के खर्च जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन शेळके यांनी दिले.

# बिबट्याच्या हल्ल्यात दुचाकीस्वार महिला जखमी ; ओतूर येथील घटना

**ओतूर । प्रतिनिधी**

दुचाकीवरून घरी परतणाऱ्या महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला केला. बिबट्याने तिच्या पायाला ओरखडून जखमी केले. ओतूर हद्दीतील तांबे मळा नं. २ येथे शुक्रवारी (दि.२१) रात्री पावणे दहा वाजता ही घटना घडली.



ज्योती राजेश ढमाले (वय ५२, रा. तांबेमळा नं-२,ओतूर, ता. जुन्नर) असे जखमी महिलेचे नाव आहे. या हल्ल्याची माहिती मिळताच ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने ओतूर येथील ग्रामीण रुग्णालयात ढमाले यांच्यावर प्राथमिक उपचार केले. त्यानंतर नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. बिबट्याच्या हल्ल्यानंतर रस्त्यावर पडल्याने ढमाले यांच्या डोक्याला जबर मार लागल्यामुळे मंचर उपजिल्हा रुग्णालयात त्यांचे सिटीस्कॅन करुन पुढील उपचारासाठी त्यांना पिंपरी चिंचवड शहरातील वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, बिबट पकडण्यासाठी वनपाल एस. एम. बुट्टे ,वनरक्षक व्ही. ए. बेले , किशन केदार, फुलचंद खंडागळे, साहेबराव पारधी व रेस्क्यू टीम यांनी घटनास्थळी पिंजरा लावला. बिबट या वन्य प्राण्याबद्दल स्थानिकांना माहिती देऊन स्वसंरक्षणार्थ करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली.

# मकोका गुन्ह्यात फरार असलेले दोघे गजाआड

वाघोली – हडपसर मधील एका मल्टीप्लेक्स चित्रपटगृहात चित्रपट पाहण्यासाठी दोघे आले. मात्र चित्रपटाऐवजी त्यांना गजाआड व्हावे लागले. मकोका गुन्ह्यात फरार असलेल्या दोन आरोपींना गुन्हे शाखा युनिट सहाने जेरबंद केले.



धर्मेनसिंग उर्फ भगतसिंग सुरजितसिंग भादा (वय-२२ वर्षे, रा. दिघी) व बादशहशिंग पोलादसिंग भोंड (वय-२३ वर्षे, रा. शिवआदर्श नगर, दिघी) अशी ताब्यात घेतलेल्या दोघांची नावे आहेत.

दिघी पोलिस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत. ते अनेक दिवसापासून फरार होते. मिळालेल्या माहितीनुसार, युनिट सहा हद्दीत कोंबिंग ऑपरेशन करीत असताना पोलीस कर्मचारी नितीन मुंढे व कानिफनाथ कारखेले यांना भादा व भोंड हे हडपसर मधील चित्रपटगृहात चित्रपट पाहण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यांनी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले.

पुढील कारवाईसाठी त्यांना दिघी पोलिस ठाण्याकडे सुपूर्त करण्यात आले आहे. युनिट सहाचे अतिरिक्त कार्यभार प्रभारी पोलीस निरीक्षक छगन कापसे, कानिफनाथ कारखेले, नितीन मुंढे, रमेश मेमाणे, बाळासाहेब सकटे, ऋषिकेश व्यवहारे, ऋषिकेश ताकवणे, नितीन धाडगे, किर्ती मांदळे, प्रतिक्षा पानसरे यांनी ही कामगिरी केली.

# मारणेच्या गुडांकडून मारहाण झालेल्या तरूणाची मुरलीधर मोहोळांनी घेतली भेट

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील कोथरूड परिसरामध्ये बुधवारी शिवजयंती दिवशी दुचाकीस्वार अभियंता देवेंद्र जोग या तरुणाला कुख्यात गुंड गज्या मारणेच्या गुंडांनी मारहाण केल्याची घटना समोर आली होती. शिवजयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीतून दुचाकी काढण्याचा प्रयत्न करत असताना वाद झाला आणि देवेंद्र जोग या तरुणाला मारहाण करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आत्तापर्यंत तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर अद्याप एक जण फरार आहे, फरार असलेला गुंड गज्या मारणेचा भाचा असल्याचा माहिती आहे. घटनेमध्ये मारहाण करण्यात आलेला तरुण देवेंद्र जोग भाजपचा कार्यकर्ता असल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर मुरलीधर मोहोळ यांनी या तरूणाला व्हिडिओ कॉलवरून संपर्क केला होता, त्याची विचारपुस केली होती, त्यानंतर आता मोहोळ यांनी पुण्यात आल्यानंतर देवेंद्र जोग या तरुणाची घरी जाऊन भेट घेऊन विचारपुस केल्याची माहिती समोर आली आहे.

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मारहाण झालेल्या देवेंद्र जोग या तरूणाची घरी जाऊन भेट घेतली. य भेटीचे फोटो आणि घटनेची माहिती त्यांच्या सोशल मिडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे. भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता देवेंद्र जोग याला मारहाणीच्या घडलेल्या प्रकारानंतर त्याच्या निवासस्थानी सपत्नीक जाऊन भेट घेतली. तीन दिवस गुजरात आणि दिल्लीमध्ये असल्याने पुण्यात पोहोचल्यावर थेट देवेंद्रच्या घरी पोहोचलो, सगळी घटना समजून घेतली, अशी माहिती मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. कोथरूड परिसरात गाडीचा धक्का लागल्याने जाब विचारल्यामुळे एका तरुणाला चार जणांनी बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.१९ फेब्रुवारी रोजी कोथरूड परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मिरवणूक निघाली होती, त्यावेळी मिरवणुकीच्या दरम्यान चार जणांनी बाईकवरून जाणाऱ्या देवेंद्र जोग यांना कट मारला. देवेंद्र जोग यांच्याशी त्या चार जणांची वादविवाद झाला आणि त्यामुळे ते चौघे मिळून देवेंद्र जोग यांना बेदम मारहाण केली. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी चौघांविरुद्ध गंभीर कलम ३०७ (खून करण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कोथरूड पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे, तर चौथा आरोपी बाबू पवार फरार आहे. बाबू पवार हा कुख्यात गुंड गजानन मारणेचा भाचा असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणात आरोपी म्हणून अमोल विनायक तापकीर, ओम तीर्थराम धर्म जिज्ञासू, किरण कोंडीबा पडवळ, आणि बाबू पवार यांचे नावे समोर आले आहेत. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# युवराज खोपडे ठरला धारेश्वर केसरीचा मानकरी

वीसगाव खोरे : कारी (ता.भोर) येथील ग्रामदैवत श्री धारेश्वर आणि भवानी माता देवाची यात्रा सोमवारी (दि.१७), मंगळवार( दि.१८) या दोन दिवसांत मोठ्या उत्साहात पार पडली. या उत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



प्रथम क्रमांकाची कुस्ती अशोक जेधे बिजनेस हेड अडावंटा इंडिया यांच्या वतीने लावण्यात आली. धारेश्वर केसरीची मानाची गदा विनोद घोलप यांनी दिली. निंबाळकर निंबाळकर तालमीचा मल्ल तन्मय रेणुसेला चितपट करुन युवा उपमहाराष्ट्र केसरी युवराज खोपडे धारेश्वर केसरीचा मानकरी ठरला. धारेश्वर केसरीची मानाची गदा मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

सोमवारी (दि. १७) सकाळी श्री धारेश्वर आणि भवानी मातेच्या मुखवट्यांना वाजत गाजत ढोलताशांच्या गजरात मंदिरात आणण्यात आले. श्री धारेश्वर आणि भवानी मातेचा अभिषेक, पुण्याहवाचन,आरती,महापूजा अशी विधिवत पूजा करण्यात आली. गावातील ग्रामस्थांनी परंपरेनुसार देवाला नैवेद्य, श्रीफळ, हार अर्पण केले.ग्रामदैवतेचा अभिषेक झाल्यानंतर श्री धारेश्वर आणि भवानी देवीला नवीन पोशाख परिधान करण्यात आला. उत्सवमूर्तीची ग्रामप्रदक्षिणा ढोल ताशाच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजी, करत मानाची काठी पालखीची पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली.

ग्रामदैवताच्या मंदिरामध्ये विविध रंगी फुलांची आकर्षक सजावट करुन मंदिराच्या कळसावर व मंदिराच्या आवारात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ग्रामदैवत धारेश्वराचीदश ग्राम प्रदक्षिणेस निघालेली पालखी परंपरेनुसार जागोजागी मानाच्या जागेवर थांबा घेऊन त्या ठिकाणच्या ग्रामस्थ, महिलांनी पालखीचे दर्शन घेतले. रात्री छोट्या मुलींच्या मल्लखांब, ढोललेझीम, दांडपट्टा,अशा पारंपरिक रांगडे खेळाच्या प्रदर्शनाने प्रैक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. लोकनाट्य तमाशा मंडळाने प्रैक्षकांची मने जिंकली. आखाड्यात रोमहर्षक अशा कुस्त्यांनी कुस्ती प्रेमीची मने जिंकली.